निसर्ग हॉलिडेज्, अलिबाग
थायलँड पटाया १६/११/२५, २६/११/२५, ३०/११/२५ ४ स्टार हॉटेल ४ रात्र/पाच दिवस विजा फ्री ₹45000/-
दिल्ली, आग्रा, अमृतसर, वैष्णोदेवी १८/१२/२५, २३/१/२०२६ वन साईट ट्रेन/ वन साईट प्लेन थ्री स्टार हॉटेल, ८ रात्र/९ दिवस ₹19999/-
केरळ, कोचीन, मुन्नार, टेकडी, वडकला, देवेंद्र, कन्याकुमारी २२/१/२६ दोन्ही साईट थ्री टायर ट्रेन एसी/थ्री स्टार हॉटेल ८ रात्र/९ दिवस ₹17999/-
बेंगलोर, म्हैसूर, उटी, कुन्नूर १/१२/२०२५ दोन्ही साईट थ्री टायर ट्रेन थ्री स्टार हॉटेल ६ रात्र/ ७ दिवस ₹13500/-
प्रभाकर पटेल : ९८८०२४१६६९
चंद्रकांत म्हात्रे : ९२६०७४५३२६/ अभिनव ठोंबर : ७७२१९२७४०४

कृषीवल
रायगड, बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५
किंमत ४ ₹

# मी चिटर आमदार!

- आ. महेंद्र दळवी यांची कबुली
- अनिकेत तटकरेंचा गौप्यस्फोट

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।
महायुतीच्या एका बैठकीत आ. दळवींनीच सांगितले होते की, 'मी चिटर आमदार आहे, मला कोणी काही करू शकत नाही. महाराष्ट्रात सर्वात चिटर आमदार असेल तर तो मीच आहे,' असा गौप्यस्फोट अनिकेत तटकरेंनी केला आहे. रायगड जिल्ह्यात महायुतीच्या नेत्यांमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट), भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडताना दिसत आहेत.



अलीकडेच शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी लोकसभा निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांच्यावर टीका करताना म्हटले होते की, ''आम्ही मतभेद बाजूला ठेवून तटकरे यांना दिल्लीला पाठवले, पण त्यांनी आम्हाला फसवले.'' या वक्तव्यानंतर महायुतीत पुन्हा एकदा कलगीतुरा पेटला आहे.

या आरोपांना प्रत्युत्तर देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते अनिकेत तटकरे यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्यावर जहरी पलटवार करत, त्यांना ''डोक्यावर पडलेले आमदार'' असे संबोधले आहे.

अनिकेत तटकरे म्हणाले, ''ते डोक्यावर पडलेत एवढंच मला सांगायचं आहे, बाकी काहीच त्याच्यात वाच्यता करायची नाही.'' त्यांनी दळवींना लक्ष्य करत पुढे म्हटले, ''स्वतःला 'चिटर आमदार' म्हणणारे, ते दुसऱ्यांकडेही त्याच नजरेने पाहतात.''

या तीव्र शब्दयुद्धामुळे रायगड जिल्ह्यातील महायुतीतील मतभेद अधिकच उफाळून आले असून, येत्या स्थानिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत.

राजकीय वर्तुळात या घडामोडींमुळे चर्चेला उधाण आल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. महायुतीतील अंतर्गत कलहामुळे प्रचारात कोणाला फायदा आणि कोणाला तोटा होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## वे|ध|क

### तरुणीवर अत्याचार

**पनवेल :** सीवुडस् येथील नामांकित महाविद्यालयातील २२ वर्षीय तरुणाने आपल्या प्रेयसीवर लैंगिक अत्याचार करुन तिचे नग्नावस्थेतील फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ॲनेक्स जोशी (२२) असे या तरुणाचे नाव असून, पनवेल शहर पोलिसांनी त्याचा शोध सुरु केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेतील पीडित तरुणी भायखळा येथे राहण्यास आहे, तर आरोपी ॲनेक्स जोशी सीवुडस् येथील महाविद्यालयात शिक्षण घेत असून, त्याच महाविद्यालयाच्या वसतिगृहात तो राहात आहे. दोन वर्षांपूर्वी पीडित तरुणीची ओळख तिची मैत्रीण आणि तिच्या प्रियकराच्या माध्यमातून ॲनेक्स जोशी याच्यासोबत झाली होती. सदर ओळख हळूहळू मैत्रीतून प्रेमात परिवर्तीत झाली. जानेवारी २०२४ मध्ये ॲनेक्स जोशीने पान २ वर

### केबलचोराला बेड्या

**पनवेल :** पनवेल-उरण रेल्वे रेल्वे ट्रॅकला लागून असलेल्या साईटवर गव्हाणफाटा परिसरात ३ लाख रुपये किमतीची कॉपर केबल चोरून नेणाऱ्या एका आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली असून, त्याच्या आणखी तीन साथीदारांचा शोध पोलीस घेत आहेत. आरोपी शिवप्रसाद गौतम (२०, रा. दिवाळे गाव) याने अनिल, अवधेश व आणखी एका इसमाने आपसात संगनमत करुन पनवेल-उरण रेल्वे रेल्वे ट्रॅकला लागून असलेले साईटवर गव्हाणफाटा परिसरात असलेली तीन लाख रुपये किमतीची ७७ मीटर लांबी असलेली कॉपर केबल कापून नेली. तसेच दोन मशीनचेदेखील नुकसान केले. याप्रकरणी पनवेल पान २ वर




# न.पा.नंतर महानगरपालिकांचा रणसंग्राम

। मुंबई । प्रतिनिधी । राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकीची आरक्षण सोडत मंगळवारी जाहीर करण्यात आली. त्यामुळे नगरपालिका निवडणुकांनंतर महानगरपालिकांचा रणसंग्राम होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून प्रभागनिहाय आरक्षण जाहीर होताच राजकीय पक्षांकडून मोर्चेबांधणीला वेग आला असून, स्थानिक राजकारण ढवळून निघाले आहे. दरम्यान, कोणत्या प्रभागात कोणत्या वर्गासाठी जागा राखीव ठरल्या, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. आता आरक्षण जाहीर होताच इच्छुकांची लगीनघाई सुरू झाली आहे. महिलांसाठी ५० टक्के आरक्षणासोबतच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीसांसाठी राखीव जागांचे वाटप निश्चित करण्यात आले आहे. दरम्यान, आरक्षणामुळे काहींचा भ्रमनिरास झाला असून, काहींना अचानक लॉटरी लागली आहे. पान २ वर

नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेत एकूण २८ प्रभाग असून त्यापैकी २७ प्रभाग हे चार सदस्यीय असून एक प्रभाग क्रमांक २८ हा तीन सदस्यीय असणार आहे. या २८ प्रभागातून एकूण १११ सदस्य निवडले जाणार आहेत. यापैकी, अनुसूचित जाती १० जागांपैकी महिलांसाठी ५ प्रभाग राखीव ठेवण्यात आले आहेत. अनुसूचित जमातीसाठी २ जागा असून १ जागा महिलेसाठी राखीव असेल. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी २९ जागा असून यातील १५ जागा महिलांसाठी राखीव असणार आहेत.

# सागर बडमे यांचा शेकापमध्ये प्रवेश

## माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्याकडून जल्लोषात स्वागत

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।
अलिबाग शहरातील चेंढरे येथील शिवसेनेचे सागर सुरेश बडमे यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. शहरातील शेकापचे नेते तथा अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या हस्ते बडमे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार अक्षया नाईक आदींसह चेंढरे येथील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. सागर बडमे हे गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनेमध्ये होते. मात्र, त्यांची घोर निराशा झाली. अखेर प्रशांत नाईक यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत त्यांनी मंगळवारी (दि.११) शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहात छोटेखानी कार्यक्रमात बडमे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.



### निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेला खिंडार

ऐन नगरपरिषद निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेचे बडमे यांच्या पक्षप्रवेशामुळे शेकापला अधिक बळ मिळाले असून, शिवसेनेत खिंडार पडले असल्याचे बोलले जात आहे. येत्या निवडणुकीत जोरदारपणे काम करणार असल्याचे सागर बडमे यांनी पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमादरम्यान सांगितले.

# दिल्ली बॉस्फोटाचा तपास एनआयएकडे

- केंद्रीय गृहमंत्रालयाचा निर्णय
- घटनास्थळी सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
केंद्रीय गृह मंत्रालयाने मंगळवारी (दि. ११) दिल्ली कार स्फोटाचा तपास राष्ट्रीय तपास संस्थेकडे (एनआयए) सोपवला. सोमवारी संध्याकाळी मध्य दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ हुंडई आय२० कारमध्ये स्फोट झाला होता. या स्फोटातील मृतांची संख्या १३ वर पोहोचली आहे. यामध्ये दोन महिलांचा समावेश आहे. वीस जखमींवर उपचार सुरू आहेत. दोन मृतदेहांची ओळख पटली आहे. उर्वरितांची ओळख डीएनए चाचणीद्वारे पटवली जाईल.




सोमवारी संध्याकाळी ६.५२ वाजता लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ चालत्या कारमध्ये एक शक्तिशाली स्फोट झाला होता. या सगळ्याच्या मागे नेमकं कोण आहे हे शोधून काढणार आणि त्यांना धडा शिकवणार, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले आहे. आता मराठी अधिकारी अर्थात एनआयएचे प्रमुख सदानंद दाते यांच्या मार्गदर्शनाखाली या स्फोटाचा तपास होणार आहे.

दरम्यान, स्फोटाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठक घेत अधिकाऱ्यांना सूचना केल्या .

### दोन अपघातांत दोघांचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल तालुक्यात एका दिवसात घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांत दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अनिता मंगेश सरफरे (४२, रा. वरळी कोळीवाडा) या आपल्या पतीसह दुचाकीने अलिबाग येथील आजारी वडिलांना भेटण्यासाठी सायन-पनवेल मार्गाने जात असताना त्यांच्या दुचाकीला कळंबोली येथील पुरुषार्थ पेट्रोल पंपाजवळ भरधाव डम्परने जोरदार धडक दिली. यात अनिता सरफरे गंभीर जखमी झाल्या. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या अपघातानंतर कळंबोली पोलिसांनी डंपर चालक छोटन यादव पान २ वर

# अलिबागमध्ये घराला आग

## लाखोंचे नुकसान, सुदैवाने जीवितहानी टळली

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।
अलिबाग शहरातील शिवलकर नाका येथील एका घराला आग लागली. या आगीत स्वयंपाकगृहातील साहित्यांसह अन्य वस्तू जळून खाक झाले. या आगीत लाखोची हानी झाली. नगरपरिषद व आरसीएफ कंपनीच्या अग्नीशमन दलाच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात यश आले. ही घटना मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि.११) सकाळी पाच वाजण्याच्या सुमारास एका रिक्षा चालकाने ॲड. आशिष रानडे यांना फोन करून घराच्या शेजारी आग लागल्याची माहिती दिली. ही बाब ॲड. रानडे यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी घटनास्थळी धाव घेत त्यांची काकी संजीवनी रानडे यांचे घर गाठले. त्या घाबरल्या होत्या. पान २ वर



### सुदैवाने मोठी दुर्घटना टळली

आगीचा भडका प्रचंड होता. स्वयंपाकगृहात असलेली सिलिंडरची टाकी तापली होती. त्यामुळे टाकीला भगदाड पडले होते. शिवलकर नाका परिसरात लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. सुदैवाने सिलिंडरचा स्फोट झाला नाही. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती.

# मासळी सुकवण्याची लगबग



● अलिबाग बंदरात वाकटी, बगे, बोंबील दांड्यावर सुकवण्याची लगबग सुरु असून, कोळी महिला कामात व्यस्त असल्याचे चित्र दिसून येत आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

# सरकारी कर्मचाऱ्यांची निदर्शने



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।
प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी जिल्ह्यातील सरकारी कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.११) जिल्ह्यात निदर्शने केली. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व तहसीलदार कार्यालय येथे दुपारी जमून सरकारविरोधात घोषणा दिल्या.

सरकारी, निमसरकारी, जिल्हा परिषद कर्मचारी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या १८ लाख कर्मचारी शिक्षकांनी ११ नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु, राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याकामी प्रशासकीय यंत्रणेच्या सहकार्यासाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कामासाठी व आचारसंहिताच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत पुकारलेल्या बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय तूर्तास स्थगित करण्यात आला आहे. मात्र, सुधारीत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शक पान २ वर

**खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास भरपाई द्या** | **उच्च न्यायालयाचे संबंधित विभागाला आदेश**

# अपघातग्रस्तांना मिळणार भरपाई



। पाली । जिल्हा प्रतिनिधी ।
रायगड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून, खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच दिलेल्या आदेशानुसार, खड्डे किंवा उघड्या मॅनहोल्समुळे झालेल्या अपघातांमध्ये मृत्यू झाल्यास वारसांना सहा लाख रुपये, तर गंभीर दुखापत झाल्यास ५० हजार ते २.५ लाख रुपये इतकी भरपाई संबंधित प्राधिकरणाकडून देण्यात येणार आहे.

भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक संस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीए किंवा संबंधित प्राधिकरणांवर राहणार असून, ही रक्कम नंतर रस्त्यांच्या देखभालीतील त्रुटींसाठी जबाबदार ठरलेल्या कंत्राटदार किंवा अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात येईल.या निर्णयामुळे जिल्ह्यातील नागरिकांना खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांमध्ये त्वरित न्याय आणि भरपाई पान २ वर

### पोलिसांना ४८ तासांत कळवावे लागणार

खड्ड्यांमुळे अपघात किंवा मृत्यू झाल्यास संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी ४८ तासांच्या आत समितीला कळविणे अनिवार्य असेल. भरपाई देण्यास विलंब झाल्यास संबंधित महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी किंवा विभाग प्रमुख अधिकारी जबाबदार धरले जातील, असा स्पष्ट इशारा उच्च न्यायालयाने दिला आहे.

### भरपाईसाठी समिती स्थापन

भरपाईची प्रक्रिया जलद आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार भरपाई समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. समितीकडून आलेल्या अर्जांवर ६ ते ८ आठवड्यांत निर्णय घेण्यात येणार असून, दर तीन महिन्यांनी शासनाला प्रगती अहवाल सादर करणे बंधनकारक असेल.

### दुसऱ्या टप्प्यात विक्रमी मतदान

**नवी दिल्ली :** बिहार विधानसभा निवडणुकीत दुसऱ्या व अंतिम टप्प्याचे मतदान मंगळवारी पार पडले. राज्यातील २० जिह्यांतील १२२ मतदारसंघांमध्ये मतदान झाले. निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात बिहारच्या जनतेने विक्रमी मतदान केले. संध्याकाळी पाच वाजताच्या आकडेवारीनुसार, बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्यासाठी ६७.१४ टक्के इतके मतदान झाले होते. तर, पहिल्या टप्प्यासाठी ६५.८ टक्के मतदान झाले आहे. बिहार निवडणुकीसाठी मतमोजणी म्हणजे निकाल शुक्रवारी लागणार आहे. यामुळे उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. पान २ वर

# एसटी बससाठी तरुण एकवटले

- महाजने एसटी बस सुरू करण्याची मागणी
- आगार व्यवस्थापकांकडून सकारात्मक प्रतिसाद

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।
रस्त्याचे कारण सांगून अलिबाग आगारातून सुटणारी एसटी बस वावेपर्यंतच पाठविली जात आहे. त्यामुळे महाजनेसह बेलोशी, सागवाडी, पाठवाडी, मठवाडी, दिवीवाडी आदी गावे, वाड्यांमधील प्रवासी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आदींचे प्रचंड हाल होत आहेत. महाजनेपर्यंत एसटी सुरु करण्यात यावी, यासाठी बेलोशी व वळवली येथील तरुण एकवटले आहेत.



बेलोशीतील राकेश भोपीसह निनाद वारगे, अंजिक्य मढवी, प्रवीण पाटील, वळवली येथील संदीप भोईर या तरुणांनी आगार व्यवस्थापक यांची भेट घेऊन महाजनेपर्यंत बससेवा सुरु करण्यात यावी, या मागणीचे पत्र दिले. यावेळी पाहणी करून तात्काळ बससेवा सुरु करण्याचे आश्वासन आगार व्यवस्थापकांकडून देण्यात आले.

अलिबाग एसटी बसस्थानकातून सकाळी पावणे सहा, सव्वा आठ, दुपारी साडेतीन, सायंकाळी साडेचार, रात्री सव्वा आठ तसेच रेवदंडा बस स्थानकातून दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास महाजने बस नियमित सोडली जाते. महाजने येथे आल्यावर अलिबाग, रेवदंडा व इतर ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांना या बसचा कायमच आधार मिळाला आहे. अलिबाग आगारातील या बसेसला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळतो. शाळा, महाविद्यालयासह नोकरी-व्यवसायानिमित्त रोहा, मुरूड, अलिबाग, पेण, पनवेल येथे जाणाऱ्या प्रवाशांसाठी एसटी बस उपयोगी ठरत आहे. गेल्या काही दिवसांपासून बेलोशी ते महाजने रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरु आहे. काँक्रिटीकरण केले जात आहे. रस्त्याच्या एका बाजूने हे काम सुरु असून, वाहतुकीसाठी पर्यायी रस्तादेखील पान २ वर

# अवकाळीमुळे कोकणातील शेतीवर अवकाळा

■ आर्थिक आणि शेतीचे गणित बिघडले

■ आंबा उत्पादकांचे वातावरणामुळे नुकसान



। रायगड । प्रतिनिधी ।

मोसमी पाऊस माघारी गेल्यानंतरही ऑक्टोबर महिन्याचे शेवटचे चार दिवस आणि नोव्हेंबर महिन्याचे पहिले दोन दिवस कोकण किनारपट्टीवर मुसळधार पाऊस झाला. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात झालेल्या हवामान विषयक स्थितीमुळे किनारपट्टीला पावसाचा तडाखा बसला.

मुळात किनारपट्टीवर भात काढण्याची लगबग सुरू होती. हळवा म्हणजे कमी दिवसांत येणाऱ्या भाताची काढणी जवळपास उरकली होती. पण, देशी किंवा गरवा म्हणजेच जास्त दिवस लागणारा भात अजून कापणीला आला नव्हता. काहीसा ओलसर भात होता. दोन-चार दिवस उन्हाचा तडका बसला असता तर भात कापणीला आला असता. नेमक्या याच काळात जोरदार पाऊस झाला. जो भात दोन चार दिवसांत कापणी आला असता, तो पुन्हा हिरवा झाला. वाळलेला भात सतत तीन चार दिवस भिजल्यामुळे उभ्या भाताला कोंब आले. त्यामुळे किनारपट्टीवर साधारण २५ ते ३० हजार हेक्टरवरील भाताचे नुकसान झाले. जो भात हाती लागला आहे तोही काळा पडला आहे किंवा त्याचा दर्जा खालावलेला आहे. कोकण किनारपट्टीवर भात हे मुख्य पीक आहे आणि नेमकं याच भात पिकाला फटका बसल्यामुळे कोकण किनारपट्टीवरील लोकांचं आर्थिक आणि शेतीचे गणित बिघडले आहे.

भात नुकसान कमी म्हणून, आंबा नुकसानीची भर पडली. मुळात मोसमी पाऊस माघारी गेल्यानंतर म्हणजेच ऑक्टोबरमध्ये किनारपट्टीवर थंडीची चाहूल लागते. दुपारी ऑक्टोबर हिटचा तडाखा, रात्रीची थंडी आणि मतलई वारे यामुळे नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून आंब्याला मोहर येण्यास सुरुवात होते. यंदा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पाऊस सुरू असल्यामुळे अपेक्षित थंडी पडली नाही. जमीन ओलसर राहिली. मतलई वारेही सुरू झाले नाही, त्यामुळे आंब्याला मोहर येण्याची प्रक्रिया थंडावली आहे. सततच्या पावसामुळे आंब्याला कोवळी पाने आली आहेत, कोवळ्या पानांवर बुरशीचा प्रादुर्भाव झाला आहे. पाऊस थांबल्यानंतर सुमारे महिन्याभराचा पाण्याचा ताण बसल्यानंतर म्हणजे जमीन कोरडी झाल्यानंतर, अपेक्षित थंडी पडल्यानंतर म्हणजे तापमान १७ ते २५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहिले आणि मतलई वारे सुरू झाले तरच डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात आंब्याला मोहर येईल अशी स्थिती आहे. आंब्याचा मोहर जर तर वर अवलंबून आहे. जाणकारांच्या म्हणण्यानुसार साधारण आंब्याचा हंगाम महिना, दीड महिना लांबणीवर पडणार आहे

दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात बाजारात येणारा हापूस यंदा मार्चअखेरीस बाजारात येईल. हापूस हंगाम किमान महिनाभर लांबणीवर जाणार आहे. दरवर्षी फेब्रुवारीपासून हंगाम सुरू होऊन जूनपर्यंत चालतो. मात्र, यंदा मार्च अखेरीस आंबा बाजारात येईल, त्यामुळे आंबा उत्पादकांना मिळणारा जास्तीचा दर यंदा मिळण्याची शक्यता नाही. तसेच उन्हाळी पाऊस लवकर झाल्यास काढणीला आलेल्या आंब्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

वादळी वारे, पाऊस झाल्यास आंब्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामुळे आता हंगाम लांबल्यामुळे नुकसान होणार आहेच पण, अखेरीस वादळी पाऊस किंवा वादळामुळेही आंबा उत्पादकांचे नुकसान होणार आहे.

भात आणि आंबा हे किनारपट्टीवरील महत्त्वाची पिके आहेत, त्यातही आंबा हे अत्यंत महत्त्वाचे नगदी पीक आहे. देशातून अमेरिकेसह युरोपीय बाजारपेठेत निर्यात होणाऱ्या मोजक्या फळांमध्ये हापूसचा समावेश होतो. त्यापासून शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना चांगला पैसा मिळतो, देशांना मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळते. असे हे नगदी पीक यंदा हवामान बदलामुळे अडचणीत आले आहे.

# माथेरान-कळंब राज्यमार्ग होणार काँक्रिटीकरण

■ १२७ कोटींचा प्रस्ताव सादर

■ रस्ता हायब्रीड तत्वावर होणार

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील आणखी एक रस्ता शासनाने हायब्रीड तत्वावर तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. कल्याण कर्जत रस्त्यावरील कर्जत तालुका हद्दीतील २३ किलोमीटर लांबीचा रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याने हायब्रीड तत्वावर बांधला होता. आता माथेरान नेरळ कळंब हा राज्यमार्ग रस्त्यावरील १० किलोमीटर लांबीचा रस्ता आरसीसी काँक्रिटचा बनविला जाणार आहे. दरम्यान,या मार्गावर नेरळ पासून कळंब पोही फाटा या भागातील रस्ता काँक्रिटचा बनविला जाणार असून त्या १२७ कोटी रुपये खर्च येणार असल्याची माहिती कार्यकारी अभियंता दिलीप हिंगे यांनी दिली आहे.

नेरळ कळंब राज्यमार्ग ७६ वर असलेल्या रस्त्यावर धामोते परिसरातील एक किलोमीटर लांबीचा रस्ता काँक्रीटचा बनविला आहे. नेरळ कळंब या १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर कोंदीवले ते दहिवली पूल या भागातील खड्ड्यातून वाट काढणे दोन चाकी, तीन चाकी, चार चाकी आणि अवजड वाहनांसाठी देखील त्रासदायक ठरत आहे.त्यामुळे या खड्ड्यांमुळे वाहने चालविणे कठीण होऊन बसले आहे. त्याचवेळी पोशीर कंपनी टेकडीपासून सिनियर सिटीझनपर्यंतच्या रस्त्यावर डांबर निघून गेले असल्याने धोकादायक बनला आहे. अन्य रस्ता चांगल्या स्थितीत असावा अशी स्थानिक वाहनचालक यांची मागणी सतत राहिली आहे.

### हायब्रीड तत्व म्हणजे काय?

सदर रस्ता बनविण्याचा ठेका जी कंपनी घेणार आहे,त्या ठेकेदार कंपनीला संबंधित रस्त्याची पुढील दहा वर्षे देखभाल दुरुस्ती ठेवावी लागते.यापूर्वी कर्जत कल्याण रस्त्यावरील कर्जत तालुक्यातील शेलू पर्यंतचा रस्ता हायब्रीड तत्वावर पी पी खारपाटील कंपनीने तयार केला होता.

हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हायब्रीड तत्वावर बांधणार आहे. शासनाने हा रस्ता हायब्रीड तत्वावर बांधण्यासाठी मान्यता दिली असून १२७ कोटींचे अंदाजपत्रक बनविण्यात आले असून या रस्त्यावर एक किलोमीटर लांबीचा रस्ता वगळता अन्य रस्तादेखील काँक्रिटचा बनविला जाणार आहे.

हा रस्ता काँक्रीटचा केला जाणार असल्याने रस्ता कर्जत सार्वजनिक बांधकाम उप विभाग यांनी हस्तांतरित केला आहे. त्यामुळे त्या अंदाजपत्रकाच्या मंजुरी मिळाल्यानंतर रस्त्यावर काँक्रिटीकरणाची कामे केली जाणार आहेत.

# माथेरानमध्ये निसर्गाच्या छटांचे दर्शन

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान या पर्यटन स्थळी वातावरणात होणारे बदल यामुळे निसर्गाची अनेक रूपे पाहायला मिळत आहेत.गेली काही दिवस सुरु असलेला ऊन पावसाचा खेळ यामुळे माथेरानमध्ये निसर्गाची विविध रूपे अनुभवायला मिळत आहेत. दरम्यान, निसर्गाच्या विविध छटा पाहण्यासाठी पर्यटक माथेरानकडे वळले आहेत.

माथेरान हे मुंबई जवळील सर्वात जवळील पर्यटन स्थळ आहे.या पर्यटन स्थळावर येणारे पर्यटक हे ५४ चौरस किलोमीटर परिघात वसलेल्या माथ्यावरील रानावरील निसर्ग न्याहाळण्यासाठी पर्यटक हे देश विदेशातून येत असतात.

त्यात माथेरानमधील निसर्ग हा दर चार महिन्यांनी वेगवेगळी रूपे घेत असतो. त्यावेळी उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तिन्ही ऋतूत माथेरान मधील निसर्ग वेगेवेगळी रूपे दाखवत असतो आणि ती रूपे न्याहाळण्यासाठी पर्यटक त्या त्या हंगामात आवर्जून येत असतात. माथेरानमधील अनेक प्रेक्षणीय स्थळे हि पर्यटकांना आकर्षित करीत असतात. यावर्षी आलेला पावसाळा लांबला आणि त्यामुळे पर्यटकांना वर्षातील पाऊण महिने पावसाचा हंगाम राहिला आहे. त्यात पावसाळ्यातील विविध रूपे पर्यटकांनी न्याहाळली आहेत.

यावर्षी चक्क नोव्हेंबर महिन्यात पाऊस सुरु होता आणि त्यामुळे नोव्हेंबर म्हणजे थंडीच्या महिन्यात माथेरान शहरात निसर्ग आपली रूपे दाखवत आहेत.

नोव्हेंबर आणि डिसेंबर महिना माथेरानमध्ये गुलाबी थंडीचा महिना समजला जातो. मात्र या महिन्यात कधी कडक ऊन आणि अचानक धुक्याची दुलई माथेरानमध्ये अनुभव देत आहे. त्यामुळे माथेरान शहरात निसर्गाची रूपे अनुभवण्यासाठी पर्यटक येत आहेत.

पर्यटकांसाठी नोव्हेंबर महिन्यातील निसर्गाचा वेगवेगळी रूपे अनुभवास देत असल्याने पर्यटक आणि माथेरानमधील स्थानिक निसर्गप्रेमी या नवीन रूपांचा आनंद घेण्यात व्यस्त असल्याचे दिसून येत आहेत.



## निवडक



### स्वरा ठाकूर बनली चार्टर्ड अकाऊंटंट

**खरोशी :** पेण तालुक्यातील वडगाव येथील रहिवाशी असणारी आगरी समाजाची लेक क स्वरा सुरेश ठाकूर हिने नुकत्याच जाहीर झालेल्या चार्टर्ड अकाऊंटंट परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून, आगरी समाजासह वडगाव परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.तिच्या या यशाबद्दल तुळजाभवानी भजन मंडळाच्या वतीने शाल पुष्पगुच्छ ट्रॉफी देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष जांभळे, एम. एस .पाटील, प्रदीपचंद्र म्हात्रे, वैभव ठाकूर, शरद पाटील, सी.एम.पाटील, नरेश पाटील, सुधाकर थळे आदींनी अभिनंदन केले. स्वरा ठाकूर ही सुरेश ठाकूर व प्रज्ञा ठाकूर यांची कन्या आहे. ठाकूर कुटुंबाचे मूळ गाव रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील हाशिवरे हे आहे. हे दांपत्य उच्चशिक्षित असून, विवाहानंतर पेण वडगाव येथे स्थायिक झाले. आपल्या दोन मुलींच्या शिक्षणाला आणि प्रगतीला सर्वाधिक प्राधान्य दिले आहे. स्वरा ही लहानपणापासूनच शांत, नम्र व अभ्यासू विद्यार्थी म्हणून ओळखली जाते. शालेय जीवनात तो सदैव हुशार विद्यार्थ्यांच्या यादीत अग्रस्थानी राहिली आहे. दहावीच्या परीक्षेत कारमेल हायस्कूल पेण येथे ८८.४० टक्के तर पेण प्रायव्हेट हायस्कूल येथे १२वी परीक्षेत ९१.३८ टक्के गुण तर बॅचलर ऑफ अकाऊंटिंग अँड फायनान्स या परीक्षेत ९.७० मिळवले आहेत. सी एस परीक्षेत तिने ५३.१७ गुण मिळवून यशाचे शिखर गाठले.



### विद्यालयात संगणक कक्षाचे उद्घाटन

**पाली/गोमाशी:** संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे स्काईज अँड रे इक्विटीज इं. लिमिटेड आणि द रोटरी क्लब ऑफ बॉम्बे, वरळी यांच्या वतीने विद्यालयास १० संगणक भेट देण्यात आले.आपण जे संगणक दिले त्याचे विद्यार्थी योग्य उपयोग करून संगणकाचे पायाभूत ज्ञान प्राप्त करतील, असे प्राचार्य बबन पालवे यांनी प्रास्ताविकेत सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणक देऊन त्याचे ज्ञान त्याना अवगत करता येईल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणक हाताळण्यास येईल याचे समाधान वाटले, असे अनुप गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. यावेळी व्यवस्थापक अनुपजी गुप्ता,व्यवस्थापक सुधीर मराठे, कुसुम डी, सिंड्रेला वर्गीस, अबीमोन वर्गीस, प्राचार्य बबन पालवे, शिक्षक अशोक शिंदे आणि शिक्षक वृंद आदी मान्यवर उपस्थित होते.



### पायी दिंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील निळगुण या भूमीतून दरवर्षी निघणाऱ्या अध्यात्म, श्रद्धा आणि भक्ति भावनेच्या संगमातून उभ्या राहिलेल्या गुरुवर्य तात्यासाहेब बाळासाहेब वासकर संप्रदायाच्या पायी दिंडी यात्रेला यंदादेखील उत्साहात सुरुवात झाली. निळगुण ते देवाची आळंदी या पायी दिंडी यात्रेला सोमवार ९ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर या कालावधीत प्रारंभ झाला असून, या यात्रेला रायगड आणि पुणे जिल्ह्यातील भाविकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला आहे. या दिंडीचे प्रस्थान सकाळी ८ वाजता राम बाबू गुगले यांच्या निवासस्थानावरून कीर्तन, अभंग आणि हरिनामाच्या गजरात झाले. या यात्रेचा मार्ग माणगाव पुणे महामार्गावरील विविध गावांमधून ताम्हिणी घाट पार करत, कोंडेथर गावाजवळून पुणे जिल्ह्याच्या सीमेत प्रवेश करणारा आहे. यात्रेत टाळ, मृदुंग, चिपळ्या, फड आणि भजनी मंडळींच्या भक्तिगीतांनी वातावरण भारावून गेले. भक्तांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि पावलांतील श्रद्धेचा ताल हे दृश्य उपस्थितांना भावनिक करणारे ठरले. यात्रेदरम्यान मार्गातील गावांमध्ये भाविकांचे स्वागत फुलांच्या हारांनी, आरतीने आणि प्रसाद वितरणाने करण्यात आले. अनेक ठिकाणी स्थानिक ग्रामस्थांनी भाविकांसाठी भोजन, निवारा आणि वैद्यकीय मदतीची व्यवस्था केली. या सोहळ्याने श्रद्धा, संस्कार आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम साकारला.

## पान १ वरून

पान १ वरून

### ...महानगरपालिकांचा रणसंग्राम

राज्यात नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून, २ डिसेंबर रोजी मतदान, तर ३ डिसेंबर रोजी निकाल लागणार आहे. त्यामुळे राज्यात ऐन थंडीच्या दिवसात राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे दिसून येत आहे. असे असताना महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर झाल्याने राजकीय पक्षांच्या मोर्चेबांधणीला वेग आला आहे.

अंबरनाथ, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, भिवंडी, मुंबई, चंद्रपूर, धुळे, वसई विरार, जालना, नांदेड, मालेगाव, इचलकरंजी, जळगाव, कल्याण, कोल्हापूर, लातूर, मिरा भाईंदर, नागपूर, नवी मुंबई, पनवेल, परभणी, पिंपरी चिंचवड, पुणे, सांगली, सोलापूर, ठाणे, उल्हासनगर, वसई विरार महानगरपालिकेसह पालघरमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर झाले आहे.

### तरुणीवर अत्याचार

पीडित तरुणीला पनवेलमधील फॉरेस्ट कॉलनी परिसरातील एका हॉटेलमध्ये नेले. तेथे त्याने जबरदस्तीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यावेळी तिच्या नकळत नग्नावस्थेतील तिचे फोटो आणि व्हिडिओ काढले, असे पीडित तरुणीने आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. काही दिवसांपूर्वी आरोपीने सदर फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले. या प्रकरणाची माहिती पीडितेच्या मैत्रिणीच्या प्रियकराच्या लक्षात आल्यानंतर त्याने त्याबाबत पीडित तरुणीला माहिती दिली. त्यानंतर पीडितेने ॲनेक्स जोशी याला जाब विचारला असता, त्याने उलट तिला धमकी दिली. यानंतर पीडित तरुणीने भायखळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपी ॲनेक्स जोशी याच्याविरुद्ध बलात्कार, धमकी देणे आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. या गुन्ह्याची सुरुवात पनवेलमधील हॉटेलमध्ये झाल्याने सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी पनवेल शहर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. पनवेल शहर पोलिसांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन आरोपीचा शोध सुरु केला आहे.

### केबलचोराला बेड्या

शहर पोलिसांकडे तक्रार दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे तसेच हेड कॉन्स्टेबल योगेश दिवेकर यांनी तांत्रिक तपास व गुप्त माहितीदाराच्या साथीने आरोपी शिवप्रसाद गौतमला अटक केली. त्याच्याकडून पोलिसांनी ५६ हजार रुपये किमतीची १४ मीटर लांबीची कॉपर केबल तसेच पाच लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी डिझायर गाडी जप्त केली आहे. त्यांच्या आणखी तीन साथीदारांचा शोध हेड कॉन्स्टेबल योगेश दिवेकर करीत आहेत.

### दोन अपघातांत दोघांचा मृत्यू

याला अटक केली आहे. तर, दुसऱ्या घटनेत तळोजा येथील नावडे गावासमोरील रस्त्यावर मिलिंद भिकाजी सुरडकर (५५) हे रस्ता ओलांडत असताना त्यांना अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडकेनंतर वाहन त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर वाहनचालक पसार झाला असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

### सरकारी कर्मचाऱ्यांची निदर्शने

सूचना प्रसिद्ध करण्यासाठी व इतर प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारी (दि.११) दुपारी जिल्ह्यात निदर्शने करण्यात आली. सरकारी कर्मचाऱ्यांच्या सुधारित पेन्शनचा प्रश्न १ मार्च, २०२४ च्या अमंलबजावणी दिनांकापासून सोडविण्याचे घोषित करण्यात आले. परंतु, त्यासंदर्भातील कार्यपद्धती व नियम विशद करणारे परिपत्रक/शासन निर्णय अद्याप पारीत झालेला नाही. जे कर्मचारी १ मार्च, २०२४ नंतर सेवानिवृत्त झाले आहेत, ते अद्याप पेन्शन लाभापासून वंचित आहेत. राज्य सरकारचा आधार असणाऱ्या व सरकारची ध्येय धोरणे प्रभावीपणे राबविणारे सरकारी कर्मचारी -शिक्षकांची देखील आर्थिक निकड पुर्ण झाली पाहिजे याकरीता ठोस निर्णय होत नाहीत. नविन शैक्षणिक धोरणाचा पुर्नविचार करावा, विनाअनुदानित व सर्वच शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचारी यांना तात्काळ पेन्शन योजनेचा लाभ मिळावा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावे, अशा विविध मागण्या निर्णयासाठी प्रलंबित असल्यामुळे निदर्शने आंदोलन करण्यात आले. निदर्शनानंतर जिल्हाधिकारी कार्यालय येथील तहसीलदार (सामान्य प्रशासन) शीतल दलाल यांना देण्यात आले. यावेळी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना जिल्हा अध्यक्ष संदीप नागे, समन्वय समिती कार्याध्यक्ष तथा जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ राज्य सहसचिव डॉ. कैलास चौलकर, कर्मचारी संघटना सरचिटणीस तथा निमंत्रक प्रभाकर नाईक, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, राज्य प्रतिनिधी परशुराम म्हात्रे, कोषाध्यक्ष दर्शना पाटील, अलिबाग अध्यक्ष दर्शना कांबळे, प्रणाली म्हात्रे, संतोष तावडे, सचिन जाधव, गोविंद म्हात्रे, रायगड जिल्हा पेन्शनर संघटना सरचिटणीस काशिनाथ जाधव इत्यादी पदाधिकारी उपस्थितीत होते.

### एसटी बससाठी तरुण एकवटले

देण्यात आला आहे. मात्र, अलिबाग आगारातून सुटणाऱ्या एसटी बसेस महाजने येथे न पाठविता वावेपर्यंतच सोडल्या जात आहेत. त्याचा फटका महाजने, बेलोशी, पाटवाडी, सागवाडी, परळवाडी, दिवीवाडी, मठवाडी येथील प्रवाशांना बसत आहे. वावेपर्यंत एसटी असल्याने प्रवाशांना साडेचार किलोमीटरपर्यंत पायपीट करत जावे लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह कामगार महिला व इतर प्रवाशांना त्यांच्या निश्चितस्थळी पोहोचण्यात अडचणी निर्माण होत आहेत. रस्त्याचे काम सुरु असल्याचे कारण दाखवून बस महाजनेपर्यंत पाठविली जात नाही. त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहे. ही बाब बेलोशी व वळवली येथील तरुणांच्या लक्षात आल्यावर त्यांनी मंगळवारी एसटी बस आगारात जाऊन आगार व्यवस्थापक राकेश देवरे यांची भेट घेतली. त्यांना समस्येची जाणीव करून देत महाजनेपर्यंत बससेवा सुरु ठेवा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. आगार व्यवस्थापक देवरे यांनी तात्काळ वाहतूक निरीक्षक यांना बोलावून तात्काळ जागेची पाहणी करून बससेवा सुरु करण्याची सूचना केली. काही अडचण असल्यास तेथील स्थानिकांशी संवाद साधून तो प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करा, असेही सुचविले. आगार व्यवस्थापक यांच्याकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे राकेश भोपीसह निनाद आदी तरुणांनी समाधान व्यक्त केले.

### अलिबागमध्ये घराला आग

आशिष रानडे, अनिल चोपडा, अमोल हजारे, संदीप रानडे, उस्मान सय्यद, राजेश आसरानी, समीर पवार, दिलीप रानडे यांनी संजीवनी रानडे यांना सुरक्षित घरातून बाहेर काढले. त्यावेळी स्थानिकांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, आगीचा भडका वाढतच राहिला. अखेर अलिबाग नगरपरिषदेच्या अग्नीशमन दलाला पाचारण करण्यात आले. त्यांच्याकडूनदेखील आग आटोक्यात येत नव्हती. अखेर आरसीएफ कंपनीच्या अग्नीशमन दलाला बोलावण्यात आले. नगरपरिषद व आरसीएफ अग्नीशमन दलाच्या मदतीने आग आटोक्यात आणली. तब्बल दोन-अडीच तासांनंतर आग आटोक्यात आणण्यात या यंत्रणेला यश आले. या आगीत सुदैवाने जीवितहानी टळली आहे. मात्र, मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. स्वयंपाकगृहासह हॉलमधील भाग जळाला आहे.

### दुसऱ्या टप्प्यात विक्रमी मतदान

''बिहारमध्ये सत्ता बदल होऊन महाआघाडी जिंकणार की पुन्हा एनडीए सत्तेत येणार याची उत्सुकता वाढली. बिहार विधानसभेच्या एकूण २४३ जागा आहेत. सत्ता स्थापन करण्यासाठी म्हणजेच बहुमतासाठी १२२ जागांची आवश्यकता असणार आहे. बिहार निवडणुकीसाठी दोन टप्प्यांत मतदान झाले. आणि दोन्ही टप्प्यांत विक्रमी मतदानाची नोंद झाली आहे. पहिल्या टप्प्यात ६५. ८ टक्के आणि दुसऱ्या टप्प्यात संध्याकाळी ५ पर्यंत ६७.१४ टक्के एवढे मतदान बिहारच्या इतिहासात प्रथम झाले आहे. त्यामुळे बिहारच्या जनतेने केले भरभरून मतदान कोणाच्या पारड्यात पडले आहे? याची उत्सुकता वाढली आहे. सत्ताधारी आणि विरोधक विजयाचे दावे करत असले तरी शुक्रवारी काय निकाल लागतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे..

### अपघातग्रस्तांना मिळणार भरपाई

मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असला, तरी रस्त्यांची देखभाल आणि दर्जा सुधारण्यात प्रशासनाची चालढकल कायम असल्याची नागरिकांची नाराजी व्यक्त होत आहे. व्याजासह भरपाई भरपाई रक्कम वेळेत न दिल्यास वार्षिक ९ टक्के व्याजासह नुकसानभरपाई देणे बंधनकारक राहील. तसेच दोषी ठरलेल्या कंत्राटदारांवर काळ्या यादीत टाकणे, दंड आकारणी आणि फौजदारी कारवाई करण्याचेही आदेश न्यायालयाने दिले आहेत.


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे जावेळे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती जमीनीच्या मूळ मालकांकडून खरेदी करण्याचे योजिले आहे.

**मौजे जावेळे, ता. श्रीवर्धन येथील मिळकतींचे परिशिष्ठ**

| अनु क्र. | गट नं. | क्षेत्र | जमीन मालकाचे नाव | सर्व जमीन मालक, अनु क्र. १ ते ८ राहणार जावेळे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड |
|---|---|---|---|---|
| १ | २४० | १-८४-०० | गोपाळ लक्ष्मण मळेकर वगैरे | |
| २ | २४३ | २-८३-०० | गोपाळ लक्ष्मण मळेकर वगैरे | |
| ३ | २४७ | १-५३-०० | गजराज जैन | |
| ४ | २४८ | १-४०-०० | पार्वती शंकर मळेकर वगैरे | |
| ५ | २४९ | ०-७६-०० | बाळकृष्ण हरी मळेकर वगैरे | |
| ६ | २५० | ०-७४-०० | रूक्मीणी सहादेव मळेकर | |
| ७ | २५४ | ०-७०-०० | पार्वती शंकर मळेकर वगैरे | |
| ८ | २५६ | ०-५०-०२ | पार्वती शंकर मळेकर वगैरे | |

वर नमुद जमीन मिळकती उपरोक्त मालकांकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेच्या ठरल्या आहेत. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांन सोबत केलेली आहे. सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून त्या त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहेत. तसेच सदर मिळकतींबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही.

वरील मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतींच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (सात) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजाराहीत आहेत. असे समजून सदर मिळकतींवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतींचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : ११/११/२०२५

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील



## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

■ श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग

■ दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१

■ अकाउंटट पाहिजे- पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contact - 9823585321

■ पाहिजे- अलिबागस्थित वृद्ध जोडप्यास सकाळी साडेदहा ते दीडवाजेपर्यंत किचन मदतनीस बाई. पगार पाच हजार आणि एका वेळचे जेवण. संपर्क- ८५३०३०९७६५

■ नागावमधील हॉटेलमध्ये कामासाठी रिसेप्शनिस्ट आणि हाउसकिपर इत्यादी माणसांची आवश्यक्ता आहे. मो. ९९२१९७८०८०

■ Design Metrics is Hiring. Need a civil draftsman/ Site Supervisor at our Studio in Alibag. Skills required - Basic Autocad Kindly share your CV on designmetricsoffice@gmail.com Contact No - 9970051876

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माणगावातील पाण्याची पातळी घसरली

## ● काळ प्रकल्पावरील कालव्याची दुरवस्था ● शेतीच्या उत्पादनवाढीवर परिणाम

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात साधारण ५० वर्षांपूर्वी सुरू झालेला 'काळ' हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी आषेचा किरण मानला गेला होता. सिंचनाचा विस्तार, शेतीची उत्पादनवाढ आणि गावागावांत पाण्याचा स्थिर पुरवठा हा या प्रकल्पाचा उद्देष होता. परंतु, आज या प्रकल्पाचे वास्तव चित्र वेगळेच दिसत आहे. या प्रकल्पावर आजतागायत कोट्यवधी रुपये जरी खर्च झाले असले तरी अपेक्षित परिणाम साधता आलेले नसल्याचे बोलले जात आहे. या प्रकल्पवारील कालव्याची दुरवस्था झाली असून येथील पाण्याची पातळी घटत चालली आहे. त्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला असून या कालव्याच्या दुरूस्तीची गरज भासू लागली आहे.



माणगाव परिसरात अलीकडे झपाट्याने झालेले नागरीकरण आणि औद्योगिक विस्तार यामुळे अनेक कालवे व नाले अतिक्रमणाच्या विळख्यात आले आहेत. परिणामी पाणीपुरवठ्याची रचनाच विस्कळीत झाली आहे. या अनियंत्रित नागरी विस्तारामुळे पावसाचे पाणी साठवण आणि भूजल पुनर्भरण या दोन्ही गोष्टींना मोठा धक्का बसला आहे. माणगावात ५० वर्षांपूर्वी 'काळ' प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली होती. या प्रकल्पावरील सिंचन योजनेचा प्रारंभ सुमारे १९७० च्या सुमारास करण्यात आला. त्यानंतर १९७७ मध्ये काळ प्रकल्प प्रत्यक्षात सुरू झाला. या प्रकल्पासाठी षासनाने सुमारे ११० कोटींचा अंदाजित खर्च मंजूर केला होता. सुरुवातीच्या आराखड्यानुसार सुमारे ३५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. प्राथमिक टप्प्यात काही गावांमध्ये कालवे व उपकालवे पूर्ण झाले आणि शेतकऱ्यांना पहिल्या दोन वर्षांत काही प्रमाणात पाणी उपलब्ध झाले. परंतु, त्यानंतर सिंचनामध्ये घट होत गेली. गेल्या काही वर्षांत कालव्यांची गळती, गाळ साचणे व देखभालीचा अभाव यामुळे कालव्यांची वहन क्षमता घटली. परिणामी, सध्या केवळ सुमारे १८०० हेक्टर क्षेत्रावरच प्रत्यक्ष सिंचन होत आहे, असे स्थानिक जलसंपदाच्या स्रोतांवरून समजत आहे. काही गावांमध्ये तर पाण्याचा पुरवठा पूर्णपणे बंद पडला आहे. २०१० मध्ये तत्कालीन जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांनी माणगाव आणि मोरबा कालव्याची दुरुस्ती केली होती. परंतु, ती अपुरी पडल्यामुळे गळती सुरुच राहीली आहे. त्यामुळे माणगावातील शेतकरी हवालदिल झाला आहे.

माणगाव परिसरातील षेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, सुरुवातीला पाणी मिळाल्याने हंगामी पीक वाढले; परंतु, आता प्रकल्पातले पाणी शेवटपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे विहिरी आणि तलावही कोरडे पडले आहेत. या प्रकल्पाला कवडीमोल भावाने सरकारने जमीन संपादन केली. मात्र, प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याचे आदेश कालव्याच्या पाण्यात वाहून गेले. नाईलाजाने आता कालव्याचे पाणी बंद झाल्याने कडधान्ये घेतली जातात. मात्र, त्यावर उदरनिर्वाह आणि गुजराण होत नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची अतिशय बिकट आणि हलाखीची अवस्था झाली आहे. त्यांच्यावर आता उपासमारीची वेळ आली आहे.

### पाण्याचा भीषण तुटवडा

स्थानिक भूजल विभागाच्या आकडेवारीनुसार, माणगाव तालुक्यातील भूजल पातळी मागील ८ वर्षांत २.५ ते ३ मीटरने खाली गेली आहे. अनेक विहिरी कोरड्या पडल्या असून, तलावांमध्ये वर्षभर पाणी टिकत नाही. चाऱ्यासाठीची कुरणे कोरडी झाल्याने पशुधनासाठी अन्न-पाण्याचा तुटवडा निर्माण झाला आहे. तसेच, प्रकल्पाच्या आरंभीच्या आराखड्यानुसार सुमारे २३ गावांना या योजनेचा लाभ मिळणार होता; मात्र, सध्या केवळ ८ ते १० गावांना आंशिक लाभ मिळत असल्याचे वास्तव समोर आले आहे. काही ठिकाणी कालवा तुटल्याने पाण्याचा प्रवाह अर्ध्यावर थांबतो, तर काही ठिकाणी गाळामुळे तेच पाणी शेतीपर्यंत पोहोचत नाही.

### प्रशासनाचे दुर्लक्ष

तज्ज्ञांच्या मते, काळ प्रकल्प व त्याच्या कालव्यांची तात्काळ दुरुस्ती करणे, गाळ काढणी आणि गळती बंद करणे अत्यावश्यक आहे. त्याचबरोबर ड्रिप व स्प्रिंकलर सिंचन पद्धतींचा प्रसार, भूजल पुनर्भरण प्रकल्प, तसेच ग्रामीण जलसंवर्धन समित्यांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. काळ प्रकल्प हे केवळ जल संपदेशी संबंधित नव्हे, तर स्थानिक अर्थव्यवस्थेशी निगडीत प्रश्न आहे. शासनाने कोट्यवधींचा निधी खर्च करूनही आज हजारो शेतकऱ्यांना त्याचा संपूर्ण लाभ मिळत नाही, ही दुःखद वस्तुस्थिती आहे. त्यामुळे 'सिंचनाचा प्रवाह थांबला की गावाचा विकासही थांबतो', हे वास्तव लक्षात घेऊन प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहावे, अशी सर्वसामान्य शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

# निवडक




## आरसीएफ निवृत्त कर्मचाऱ्यांची सोशल फोरम मासिक सभा

**अलिबाग** : आरसीएफ मधून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी एक सोशल फोरमची स्थापन केली आहे. या फोरमचे अध्यक्ष रविंद्र वर्तक हे असून सध्या १,०५० सभासद आहेत. त्यांची दरमहिन्याच्या संकष्टी चतुर्थीला कुरूळ वसाहतीतील पंचकोनी गणेश मंदिरात मासिक सभा होते. यावेळी निवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्त जीवन सुकर होण्यासाठी आवश्यक ती सामाजिक, मानसिक मदत फोरम तर्फे करण्यात येते. त्याच बरोबर समाजातील गरजू लोकांसाठी परिस्थितीनुरूप मदत उभी करणे, विविध विशयांबद्दल जागरूकता, होणारे बदल, आनंदी जीवनासाठी व्याख्याने व उपक्रम वेळोवेळी आयोजित करण्यात येत असतात. दरम्यान, भारताचे राष्ट्रीय गीत असलेल्या व स्वातंत्र्य लढ्यातील सैनिकांना प्रेरणादायी ठरलेल्या 'वन्दे मातरम' या गीतास ७ नोव्हेंबर रोजी दीडषे वर्षे पूर्ण झालीत. त्यास अनुषंगून नुकत्याच पार पडलेल्या फोरमच्या मासिक सभेत या गीतासंदर्भात माहिती देऊन संपूर्ण 'वन्दे मातरम' गीत फोरमचे कोअर कमिटी मेंबर भालचंद्र देषपांडे यांनी सादर केले. या मासिक सभेचे अध्यक्षस्थान सचिव श्रीनिवास पाटील यांनी भूषविले, तर सूत्र संचालन रमेश म्हात्रे यांनी केले.



## चित्रफितीतून बिबट्याबाबत जनजागृती

**खांब** : रोहा तालुक्यातील बाहे येथील बिबट्या प्रकरणामुळे लोकांच्या मनात निर्माण झालेला संभ्रम व भीती दूर करण्यासाठी 'बिबट्या वैरी नाही, शेजारी' या चित्रफितीतून बिबट्या बाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी 'बिबट्या वैरी नाही, शेजारी' या चित्रफितीच्या माध्यमातून बिबट्याची निवासस्थाने, त्याचे खाद्य, बिबट्याचा वावर इत्यादी माहिती दाखविण्यात आली आहे. तसेच, सह्याद्री वन्यजीव संस्थेचे सागर दहिंबेकर आणि वनपाल आर.एस. गायकवाड यांनीही ग्रामस्थांना संबोधित केले. पोलीस पाटील मनोज थिटे व शिक्षक सुनील थिटे यांनी या प्रबोधनाच्या कार्यक्रमासाठी विशेष प्रयत्न करून लोकांमध्ये निर्माण झालेली भीती व संभ्रम दूर करण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी रोहा वनविभाग खांब परिमंडळाचे वनपाल आर.एस. गायकवाड, वनरक्षक एस.एन. शिंदे, ए.डी. लाटे, एम.बी. फडवले, एक.एस. भगत तसेच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेचे सागर दहिंबेकर, प्रविण भगत, विनय ठाकूर व परेश महाबळे आदी उपस्थित होते.



## शिक्षकांसाठी मूल्यवर्धन प्रशिक्षण

**खरोशी**: महाराष्ट्र शासन आणि शांतीलाल मुथ्था फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मूल्यवर्धन प्रशिक्षण पंचायत समितीच्या माध्यमातून पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्रायव्हेट हायस्कूल व कन्या शााळा पेण येथे शिक्षकांसाठी मूल्यवर्धन प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. यावेळी पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांनी उद्घाटन केले. हे प्रशिक्षण पाच गटातून २३ सुलभकांच्या मार्गदर्षनाखाली सुरू आहे. दुसऱ्या टप्प्यात १० ते १२ नोव्हेंबर अशा तीन दिवस चालणाऱ्या प्रशिक्षण वर्गासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खासगी प्राथमिक शााळा, नगरपालिका आणि माध्यमिक शाळा असे एकूण ३२० शिक्षक उपस्थित आहेत. तर, पहिल्या टप्प्यात ३४२ शिक्षकांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

## वरसोली यात्रेची लगबग सुरू

**अलिबाग** : अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील श्री विठोबा देवस्थान येथे भरणारी यात्रा आंग्रेसरकारच्या कारकिर्द पासुन सुरू असून या यात्रेला २०० वर्षांपूर्वीपासूनची परंपरा आहे. यंदा ही यात्रा शनिवार दि.१५ ते गुरूवार दि.२० नोव्हेंबरपर्यंत भरणार आहे. यादरम्यान, किर्तन, भजन, पालखी इत्यादी कार्यक्रम ठरलेल्या वेळेनुसार होणार आहेत. तसेच, यात्रेत आपले दुकान मांडणाऱ्यांना जागेचे वाटप यात्रा सुरू होण्याच्या २ ते ३ दिवस आधी होणार आहे. मात्र, देवस्थान व ग्रामपंचायत यांचा कर भरल्याशिवाय जागा कायम होणार नाही, असे श्री विठोबा देवस्थान ट्रस्ट वरसोली-अलिबागचे प्रमुख विश्वस्त रमेश नाईक यांनी सांगितले आहे.

# धुतूमचा रस्ता बनला 'मृत्यूचा सापळा'

**। उरण । प्रतिनिधी ।**

धुतूम गावातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग आणि त्यालगतचा सेवा मार्ग गेल्या काही वर्शांपासून अक्षरषः 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. देशातील सर्वात मोठ्या बंदर उद्योगाला जोडणारा हा महामार्ग असला तरी या मार्गावर दिवसेंदिवस वाढत असलली अनधिकृत पार्किंग आणि अवजड वाहतुकीमुळे नागरिकांच्या जीवाला कायमचा धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, धुतूम गावातील तब्बल २२ तरुण आणि नागरिकांनी या महामार्गावरील अपघातांमध्ये आपला जीव गमावला आहे. ही बाब अत्यंत संतापजनक आणि वेदनादायी आहे.



२०१८ साली उरण सामाजिक संस्थेने दाखल केलेल्या जनहित याचिकेत मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट व मार्मिक नोंद करत प्रषासनाला कठोर आदेष दिले होते. मात्र आज, सात वर्षानंतरही परिस्थिती बदललेली आहे. मृत्यूच्या सावटाखाली नागरिक रोज प्रवास करीत आहेत; परंतु, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि स्थानिक प्रशासन यांच्या निष्क्रियतेमुळे या जीवघेण्या व्यवस्थेत काहीच सुधारणा झालेली नाही. धुतूमचे सरपंच एस.पी. ठाकूर यांनी या गंभीर प्रश्नाची दखल घेत भारतीय रस्ते विकास प्राधिकरण यांच्या पनवेल येथील प्रकल्प संचालकांना लेखी निवेदन दिले आहे.



## शेकाप, दीक्षा फाऊंडेशनच्यावतीने आरोग्य शिबीर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्ष व दीक्षा फाऊंडेशनच्यावतीने रविवारी (दि.९) तळोजा येथील मारवा ग्रह संकुलात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन शेकाप नेते व माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या आरोग्य शिबिराला पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, पनवेल महानगरपालिका चिटणीस प्रकाश म्हात्रे, पनवेल कृउबा समितीचे संचालक देवा मढवी, नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील, समाजसेवक दिलीप जाधव आदी मान्यवरांनी भेट दिली.

## भात कापणीला मजुरांचा अभाव

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

परतीच्या पावसात काही ठिकाणी पिकांची नासाडी झाल्याने बळीराजावर संकट निर्माण झाले असले तरी बळीराजा भात कापणी करण्यात व्यस्त झाला आहे. त्यातच दिवसेंदिवस वातावरणात वाढणाऱ्या गारव्यामुळे भाताच्या लोंब्यापासुन भाताचे दाणे वेगळे होत असल्यामुळे हातात हवे तेवढे धान्य मिळणार की नाही, अशी स्थिती बळीराजाची झाली आहे. अशातच शेतमजुरांच्या कमतरतेमुळे शेतीची कामे खोळंबली असुन मजुरांची मनधरणी करुन भात कापणीसाठी सुरवात झाल्याचे मुरूड तालुक्यात पहावयास मिळत आहे. पंचक्रोशी भागातून येणाऱ्या मजुरांची दिवाळीपूर्वीच मनधरणी करावी लागत असून पावसामुळे कापणी लांबणीवर पडली आहे. त्यातच बदलत्या वातावरणामुळे उपलब्ध मजुर देखील हैराण होत आहेत. त्यामुळे लवकरात लवकर भातकापणी आटोपून घेण्याच्या प्रयत्नात शेतकरी वर्ग आहे.



## उरणमध्ये अवैध धंद्यांचा धडाका

### प्रशासन झोपेत

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात शासनाची जमीन म्हणजे जणू कोळशाची खाणच ठरत आहे. जो हात घालतो, तो सोनं उचलत आहे. येथील सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल, सिडको, मेरीटाईम बोर्ड, जेएनपीटी, वन विभाग या सर्वांच्या जमिनींवर परप्रांतीयांनी बेकायदेशीर अतिक्रमण करून आपले धंदे चांगलेच फुलवले आहेत. या अवैध धंद्यांमध्ये कंटेनर यार्ड, भंगार दुकाने, ढाबे, सर्व्हिस सेंटर, गॅरेज, बार, रेस्टॉरंट, आठवडा बाजार अशा असंख्य व्यवसायांचा जमाव उरणच्या अंगावर बसला आहे. धक्कादायक म्हणजे हे धंदे करणारेच सांगतात की, आम्ही दरमहा लाखोंचा मलिंदा देतो, म्हणून कुणी कारवाई करत नाही. हीच उरणची काळी वस्तुस्थिती आहे.



# मुरूड आगाराचा मनमानी कारभार

### प्रवाशांना बस थांबत नसल्याची तक्रार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मूरूड आगारातून सुटणाऱ्या एसटी बसेस नांदगावमध्ये थांबा घेत नसल्याच्या तक्रारींत वाढ होत आहे. त्याचा त्रास महिला प्रवाशांसह विद्यार्थ्यांना होत आहे. त्यामुळे मूरूड आगाराच्या मनमानी कारभाराबाबत प्रवासी वर्गातून संताप व्यक्त केला जात आहे. एसटी महामंडळ विभागातील जिल्ह्याचे विभाग नियंत्रक चौरे यांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.



मुरूड हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण असून लाखोंच्या संख्येने या ठिकाणी पर्यटक येतात. मुरूडमधून नोकरी व्यवसायाबरोबरच शिक्षणासाठी ये-जा करणाऱ्यांची संख्यादेखील प्रचंड आहे. त्यामुळे एसटीतून प्रवास करण्यावर प्रवासी भर देतात. परंतु, मुरूड आगारातून सुटणारी एसटी बस नांदगाव स्थानकाजवळ थांबा घेत नसल्याच्या तक्रारी वाढत आहे. सायंकाळच्या वेळेला घरी जाणाऱ्या विद्यार्थीनींना तसेच नोकरी व्यवसायानिमित्त आलेल्या अन्य प्रवाशांना नांदगावमध्ये ताटकळत राहवे लागत आहे. याबाबत अनेक वेळा स्थानिकांनी आगार व्यवस्थापक राहूल शिंदे यांच्याशी संपर्क साधला, मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप प्रवासी वर्गाकडून केला जात आहे. सोमवारी सायंकाळी दोन तास नांदगाव स्थानकाजवळ प्रवासी विशेष करुन विद्यार्थीनी उभ्या होत्या. परंतु, मुरूडची एकही एसटी बस थांबली नाही. त्यामुळे मुरूड आगाराच्या मनमानी कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. नांदगांवमध्ये बस थांबली नाही, तर आगामी काळात मुरूड आगारावर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा शेकाप मुरूड पुरोगामी युवक संघटना उपाध्यक्ष ॲड. मनिष माळी यांनी दिला आहे.



## बोर्लीपंचतनमधील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

ग्रामीण रस्त्यांच्या विकासाला अधिक गती देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने 'मुख्यमंत्री ग्रामसडक योजना' सुरु केली. केंद्र शासनाच्या पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर आखणी करण्यात आलेल्या या योजनेतून राज्यातील वाड्या, वस्त्या, गावांना रस्ते बांधून देण्याबरोबरच सध्या अस्तित्वात असलेल्या परंतु दुरावस्था झालेल्या रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. परंतु, शासनाच्या या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याने वर्षभरातच त्यांची दुरवस्था होत आहे. त्यामुळे नागरिक आणि वाहन चालकांना याचा अतोनात त्रास सहन करावा लागत आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत व शहरवजा गाव असलेल्या बोर्लीपंचतन गावातील अंतर्गत रस्त्यांची प्रचंड प्रमाणात दयनीय अवस्था झाली असून संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधींचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांकडून संताप व्यक्त होत आहे. बोर्लीपंचतन ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या कोंडे पंचतन या गावाला जोडणाऱ्या ६ कि. मी. रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर झाले होते. १३ नोव्हेंबर २०२३ रोजी सूरू करण्यात आलेले हे काम १५ मे रोजी पुर्ण करणे अपेक्षित असताना अद्यापही हे काम अपुर्णच आहे. मुळात अरुंद असणाऱ्या या रस्त्याला कायमच जड वाहतुकीचा फटका बसत असून या रस्त्यावरून मार्गक्रमण करणारे पादचारी व वाहन चालकांना खड्डे चुकवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या परिसरात राहणारे रहिवाशी व वाहन चालकांचा कंत्राटदाराविरोधात असणारा तीव्र संताप पाहता दोनच दिवसांपूर्वी संबंधित कंत्राटदाराने या रस्त्याच्या अपूर्ण असलेल्या कामाला सुरुवात केली आहे. परंतु, या रस्त्यावरून कायम होणाऱ्या जड वाहतूकीमुळे रस्त्याची पुन्हा तीच अवस्था होणार का? असा प्रश्न नागरिक व वाहन चालक विचारत आहेत.

### २६ हजार मतदारांच्या बोटावर भवितव्य | महिला उमेदवार शोधण्यासाठी धडपड

# उरण नगर परिषदेच्या गादीवर कोण बसणार?

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगर परिषदेच्या सत्तेची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणुकीची रणशिंगे वाजली असून, सोमवार दि. १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. त्यानंतर उरणच्या गल्लीबोळात राजकीय तापमान चांगलेच चढले आहे. त्यामुळे उरणच्या २६,२१४ मतदरांवर नगराध्यक्ष व नगरसेवकांचे भवितव्य ठरणार असून यावेळी कोण बाजी मारणार? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.




यावेळी उरण नगरपालिकेतील एकूण १० प्रभागांतून २१ नगरसेवक आणि १ नगराध्यक्ष असे २२ जनप्रतिनिधी निवडून देण्यात येणार आहेत. नगराध्यक्षपद महिला राखीव असल्याने राजकीय पक्षांच्या गणितात उलथापालथ झाली असून, प्रत्येक पक्षाला योग्य महिला उमेदवार शोधण्यासाठी धडपड करावी लागत आहे. उरणमध्ये एकूण १३,३११ पुरुष आणि १२,९०३ महिला असे मिळून २६,२१४ मतदार असून ते आता उरण नगरपालिकेच्या गादीवर कोणाला बसवायचे, हे ठरवणार आहेत. या निवडणुकीत प्रभागनिहाय मतदारसंख्या पाहिली असता प्रभाग १ मध्ये पुरुष १६०५, महिला १७०६, प्रभाग २ मध्ये पुरुष १५४९, महिला १६१३, प्रभाग ३ मध्ये पुरुष १२५२, महिला ११६८, प्रभाग ४ मध्ये पुरुष १४१६, महिला १३२१, प्रभाग ५ मध्ये पुरुष १२९८, महिला १२६८, प्रभाग ६ मध्ये पुरुष १०१०, महिला १०४९, प्रभाग ७ मध्ये पुरुष १५६६, महिला १३८८, प्रभाग ८ मध्ये पुरुष ९५५, महिला ८९३, प्रभाग ९ मध्ये पुरुष ११४८, महिला ११४५ आणि प्रभाग १० मध्ये पुरुष १५१२, महिला १३५२ अशी मतदारांची आकडेवारी आहे. प्रभाग १ ते ९ मधून प्रत्येकी २ नगरसेवक, तर प्रभाग १० मधून ३ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. त्यासोबतच संपूर्ण उरण शहराच्या नेतृत्वासाठी एका नगराध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे. २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून, निकाल ३ डिसेंबर रोजी घोषित केला जाणार आहे. त्यामुळे केवळ काही आठवड्यांतच उरणच्या भवितव्याचा निर्णय होणार आहे.

### उमेदवारीसाठी कोट्यवधी रुपयांचा गेम

मागील कार्यकाळात महिला नगराध्यक्षापदावर होत्या आणि त्यानंतर तीन-चार वर्षांपासून प्रशासकीय अधिकारी कारभार पाहत आहेत. आता पुन्हा निवडणूक जाहीर झाली असून नगराध्यक्षापद पुन्हा महिलांसाठीच आरक्षित आहे. त्यामुळे पक्षांचे गणित पुन्हा एकदा गुंतागुंतीचे बनले आहे. सर्व पक्ष आता योग्य महिला चेहरा शोधण्यात गुंतले आहेत. दरम्यान, या उमेदवारीसाठी कोट्यवधी रुपयांचा गेम असल्याची कुजबुज राजकीय पातळीवर सुरू आहे. त्यामुळे प्रामाणिक आणि लोकाभिमुख चेहरा पुढे आणण्याऐवजी पैशाच्या बळावर उमेदवारी मिळवणाऱ्यांना संधी मिळते, अशी चर्चा गल्लीबोळांत रंगली आहे.

# दिल्ली स्फोटाचे हादरे

दिल्लीत सोमवारी झालेला बाँबस्फोट अत्यंत दुर्दैवी आहे. राजधानीच्या गजबजलेल्या भागात ऐन कामाच्या दिवशी असा स्फोट झाल्याने सामान्य जनतेला आपल्या असुरक्षितपणाची पुन्हा एकवार जाणीव झाली असेल. मात्र त्याचसोबत हा स्फोट मोदी-भक्तांची धुंदी उतरवणारा आणि मोदी-शाह यांच्या माजखोरपणाला टाचणी लावणारा असादेखील आहे हे नमूद करायला हवे. नरेंद्र मोदी सत्तेत आल्यापासून या देशात दहशतवादी कृत्ये बंद झाली, बाँबस्फोट बंद झाले असा टेंभा मोदी, शाह आणि त्यांचे भक्त हरहमेश मिरवत असतात. आधीच्या काळात मनमोहनसिंग किंवा तत्सम काँग्रेस नेत्यांचीच जणू अतिरेक्यांना फूस होती असा आभास हे नालायक लोक यातून उभा करीत असतात. अतिरेकी हल्ले रोखणे हे अमेरिका वा युरोपलाही पूर्णतः शक्य झालेले नाही. धार्मिक विद्वेषाच्या प्रचाराने ज्यांचे डोके पूर्ण खराब झाले आहे अशा तरुणांची आत्मघातकी पथके उभी राहत असतील तर त्यांचे स्फोट थांबवणे सहजसोपे नसते. दिल्लीतील स्फोटातही बहुदा हेच घडले आहे. याबाबतची चौकशी अजून प्राथमिक टप्प्यात असली तरी जी माहिती उपलब्ध झाली आहे त्यावरून एका आय-ट्वेंटी मोटारीतील तीन जणांनी हा स्फोट घडवून आणला असावा असा संशय आहे. यामध्ये हे तिघे अर्थातच जागीच जळून खाक झाले असावेत. आता ही मोटार व तिच्यातील स्फोटके कुठून आली वगैरे तपास होईल. या संदर्भात काही जणांना अटक होईल. याचे सूत्रधार कोण आहेत याचा अंदाजही आपल्याला करता येईल. पण जोवर याच्या सूत्रधारांना व त्यांच्या खतरनाक अशा धार्मिक विद्वेषाच्या तत्वज्ञानाचा नायनाट होत नाही तोवर हे नाहीतर आणखी कोणी अतिरेकी असे स्फोट घडवतच राहतील अशी अवस्था आहे. आणि धार्मिक विद्वेषाचे तत्वज्ञान नष्ट करणे म्हणजे पाकिस्तानवर बाँबहल्ले करणे नव्हे हे मोदी सरकारने लक्षात घ्यायला हवे. पहलगाममधील हल्ल्यानंतर आपण ऑपरेशन सिंदूर केले. त्यात पाकिस्तानमधील अतिरेक्यांच्या तळांवर अचूक हल्ले केले. हे आपल्या लष्कराचे मोठेच यश होते. पण एक सिंदूर झाले म्हणजे सर्व काही संपले असे होत नसते.

## गृह खात्याचे अपयश

दोन हजारच्या पहिल्या दशकात हैदराबाद, कोलकाता, बंगळुरु, दिल्ली, पुणे अशा सर्व शहरांमध्ये अतिरेक्यांनी अनेक स्फोट घडवले होते. मुंबईमध्ये तर दर काही दिवसांनी बाँबस्फोट घडत असत व २६ नोव्हेंबरला कसाब वगैरेंचा हल्ला तर कोणीच विसरू शकत नाही. पाकिस्तानात बसलेले दहशतवादी हे हल्ले घडवून आणत असल्याचे अनेकदा निष्पन्न झाले होते. अलिकडे पाकिस्तान स्वतःच अनेक प्रकारच्या बंडाळींनी जर्जर झाला आहे. तेथील तालिबानवादी आणि पाकिस्तानी लष्कर यांच्यात सध्या धुमश्चक्री सुरू आहे. पाकिस्तानचा एकेकाळचा मित्र अफगाणिस्तान आता त्याच्या विरोधात गेला आहे. पहलगाम हल्ल्याचा अफगाणिस्तानातील तालिबानी सरकारने तात्काळ व तीव्र निषेध केला होता. मध्यंतरीच्या काळात अमेरिकेने पाकिस्तानला मदत बंद केली होती. या सर्वांचा परिणाम म्हणून पाकिस्तानातून भारतात येणारी रसद आटली होती. पण आता ट्रम्प यांनी पाकिस्तानला मित्र घोषित केल्यावर पाकिस्तानी सरकार व दहशतवादी यांना नव्याने अवसान आलेले दिसते. याचा बीमोड करण्यासाठी भारताला दीर्घसूत्री कार्यक्रम राबवावा लागेल. त्यासाठी देशातील मुस्लिम जनतेला शत्रू ठरवून चालणार नाही. उलट तिच्या मदतीनेच हा दहशतवादविरोधी लढाई यशस्वी होऊ शकेल. अनेकदा पाकिस्तानी दहशतवादी मुस्लिम समाज वा संस्थांच्या आडोशाने काम करतात. दिल्ली स्फोटामध्ये काश्मीरच्या तीन डॉक्टरांचा सहभाग असावा असा संशय आहे. स्फोटाच्या आदल्या आठवड्यात आपल्या पोलिस दलांनी प्रचंड शस्त्रसाठा, स्फोटके जप्त केली होती व काही जणांना अटकही केली होती. त्यात काश्मीरच्या या दोन डॉक्टरांचा समावेश होता. फरिदाबादमधील एका वैद्यकीय महाविद्यालयात तसेच खासगी रुग्णालयात ते काम करीत होते. काश्मिरात जैश ऐ महम्मदची पोस्टर्स लावण्याच्या प्रकाराशी त्यांचा संबंध असल्याचे आढळले होते. म्हणजेच ऑपरेशन सिंदूर झाल्यानंतरही पाकिस्तानातून रसद येणे व पाकिस्तानी दहशतवादाबद्दल सहानुभूती हे संपलेले नाही. अशा गोष्टी पाकिस्तानात बाँब टाकून नव्हे तर इथे आपल्या धोरणात बदल करूनच संपवता येऊ शकतात हे मोदी सरकारला जितक्या लवकर कळेल तो सुदिन असेल. दरम्यान, शाह यांचे पोलिस दल व गुप्तचर खाते पूर्णपणे अयशस्वी झाल्याचे पहलगाम नंतर पुन्हा एकदा स्पष्ट झाल. पहलगाममध्ये अतिरेकी आले कसे हे आजतागायत उलगडलेले नाही. दिल्लीतील स्फोटामागे कोण आहे याचा उलगडा कदाचित अधिक भराभर होईल व अटकाही होतील. पण तरीही हा स्फोट रोखता येऊ शकलेला नाही हे सत्य बाकी उरेलच. दुसरे म्हणजे पोलिसांनी आधीच पकडले असले तरी प्रचंड प्रमाणात स्फोटके दिल्ली, अहमदाबाद इत्यादी ठिकाणी ती पोचली होती हेही चिंताजनक आहे.

## सिंदूर झाले तरीही...

ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तानचा दहशतवाद जणू कायमचा नेस्तनाबूत झाला अशा वल्गना मोदी सरकारातील लोक करीत होते. पण पहलगामसारख्या स्फोटांना युध्द हे कायमस्वरुपी उत्तर असू शकत नाही, पुन्हा स्फोट झाला तर भारत काय करणार असा प्रश्न आम्ही याच स्तंभातून केला होता. दिल्ली स्फोटामुळे मोदी सरकारपुढे हा प्रश्न पुन्हा एकवार विक्राळ स्वरुपात उभा राहिला आहे. मोदी आणि भाजपच्या भक्तांच्या डोक्यात मुस्लिमद्वेषाचे विष भिनले आहे. सतत मुस्लिमांना गुन्हेगार ठरवणे, ते देशद्रोही आहेत असे गृहित धरणे आणि हिंदू समाजाला चिथावणी देणे एवढेच उद्योग यांनी गेले दहा वर्षे केले आहेत. पाकिस्तानात धर्मांध मुस्लिमांनी हेच त्यांच्या समाजात केले आहे व तेथूनच आत्मघातकी अतिरेकी ते येथे पाठवत असतात. या मुस्लिम धर्मांध व आत्मघातक्यांशी लढायचे असेल तर येथील मुस्लिम समाजाला सोबत घ्यायला हवे. त्यांना आश्वस्त करायला हवे. त्यांच्यात काही जण चुकीच्या मार्गाने जात असतील तर त्यांना चांगल्या मार्गाने समजावयला हवे. त्यांना सतत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून चालणार नाही. एप्रिलमध्ये पहलगाममध्ये स्फोट झाला तेव्हा सगळ्या काश्मिरींना देशद्रोही ठरवून त्यांच्यावर बहिष्कार घालण्याची हाक भाजपवाल्यांनी दिली होती. आता तर मोदी व शाह यांच्या नाकाखाली, म्हणजे दिल्लीत स्फोट झाला. पहलगाममध्ये स्फोट झाला तेव्हा ओमर अब्दुल्ला सरकारवर खापर फोडण्याचा प्रयत्न झाला. वास्तविक काश्मीरचे पोलिस दल, लष्कर इत्यादी सर्व मोदी व शाह यांच्या हुकुमाखाली आहे. आता दिल्लीत तर भाजपचेच सरकार आहे. शिवाय पोलिसही शाह यांचे आहेत. तरीही हा स्फोट झाला तर आता भाजपचे भक्त कोणावर बहिष्कार घालणार? दिल्ली बाँबस्फोटामुळे मोदी, शाह व त्यांच्या भक्तांच्या काल्पनिक सुरक्षित किल्ल्यालाही हादरे बसले असतील व इथून पुढे त्यांना थोडी तरी अक्कल येईल अशी आशा आहे.

विचार

# चीनशी करारामुळे अमेरिकेचा जीव भांड्यात!

***अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात अलिकडेच करार झाला. दोन महासत्तांचे प्रमुख सहा वर्षांनंतर भेटले. वादग्रस्त मुद्दे बाजूला ठेवून सध्याच्या तातडीच्या प्रश्नांतून त्यांनी मार्ग काढला. दोन महासत्तांत झालेल्या वाटाघाटींनी जगाने सुटकेचा निश्वास टाकला आहे. अर्थात या करारातून पहिल्या क्रमांकाची महासत्ता दुसऱ्या क्रमांकाच्या महासत्तेपुढे नमली, असा अर्थ काढला जात आहे.***



**प्रा.जयसिंग यादव**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग सहा वर्षांनी भेटले आणि दोन्ही महासत्तांमधील बैठक महत्त्वाची होती; संपूर्ण जगाचे या बैठकीवर लक्ष ठेवले होते. हे नेते अलिकडेच दक्षिण कोरियातील बुसान विमानतळावर भेटले आणि त्यांची बैठक शंभर मिनिटे चालली. बैठकीपूर्वीच ट्रम्प यांना बैठक यशस्वी होईल, असा विश्वास होता. त्यामागे कारणही तसेच होते. अमेरिकेला चीनबरोबर वाटाघाटी करून 'रेअर अर्थ मॅग्नेट'च्या आयातीचा आणि सोयाबीनच्या निर्यातीचा प्रश्न सोडवणे जास्त महत्त्वाचे होते. अमेरिकेच्या शेतकऱ्यांचा तसेच तंत्र उद्योगाचा मोठा दबाव ट्रम्प यांच्यावर होता. दोन महासत्तांच्या प्रमुखांच्या भेटीनंतर अमेरिकेच्या अध्यक्षांनी मोठी घोषणा केली. त्यात म्हटले होते, की चीनमधून येणाऱ्या वस्तूंवरील एकूण सरासरी शुल्क ५७ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की अमेरिकेने चीनवर अनेक वेळा शुल्क लादले आहे. रागाच्या भरात ट्रम्प यांनी हे शुल्क जाहीर केले. ट्रम्प यांच्या मागील कार्यकाळात स्टीलवर १९ टक्के, एप्रिल २०२५ मध्ये दहा टक्के बेसलाइन शुल्क, फेंटानिलवर २० टक्के शुल्क आणि इतर शुल्क समाविष्ट होते. अशा प्रकारे अमेरिकेने चीनवर सरासरी ५५ टक्के शुल्क लादले होते. ऑगस्ट २०२५ मध्ये वाढून ते ५७ टक्के झाले. तथापि, दोन्ही नेत्यांमधील बैठकीनंतर, चीन आता सरासरी ४७ टक्के शुल्काच्या अधीन असेल. जिनपिंग यांच्याशी बोलल्यानंतर, ट्रम्प यांनी घोषणा केली, की चीनवर लादलेले फेंटानिलशी संबंधित शुल्क वीस टक्क्यांवरून दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जात आहे. परिणामी अमेरिकेचा जीव भांड्यात पडला असल्यास नवल नाही.

ट्रम्प यांच्या शुल्ककपातीच्या बदल्यात जिनपिंग आता अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करण्यास सहमत झाले आहेत. चर्चेबाबतच्या इतर तपशिलामध्ये टिकटॉक कराराबाबत चर्चेचा कोणताही उल्लेख नव्हता. दोन्ही नेत्यांनी सांगितले, की ते युद्ध संपवण्यासाठी एकत्र काम करतील. दोन्ही बाजूंनी व्यापार आणि सहकार्यावर महत्त्वाचे करार केले. शी जिनपिंग फेंटानिल दरवाढ थांबवण्यासाठी कठोर परिश्रम करतील आणि अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांवर पुढील निष्कर्ष लवकरच घोषित केले जातील. 'रेअर अर्थ मॅग्नेट'वर दर वर्षी चर्चा केली जाईल. या करारानंतर इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक वाहने आणि संरक्षण उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या साहित्यांचा जागतिक प्रवेश स्थिर करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल पुढे पडले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी दुर्मिळ पृथ्वी खनिजांबाबत करार केला असल्याचे जगाला सांगत जणू सुटकेचा नि:श्वास सोडला. ट्रम्प यांनी सांगितले, की चीनने पुढील वर्षासाठी अमेरिकेला 'रेअर अर्थ मॅग्नेट' पुरवण्यास सहमती दर्शवली आहे. ट्रम्प यांनी असेही जाहीर केले की फेंटानिल (एक अंमली पदार्थ) साठी चीनवरील कर दहा टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासह, अमेरिकेचा चीनवरील एकूण करभार आता ५७ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. 'जिनपिंग हे खूप कठोर वाटाघाटी करणारे आहेत, ही चांगली गोष्ट नाही,' असे ट्रम्प यांनी सांगितले. या भेटीच्या निमित्ताने अमेरिका आणि चीनमधील सर्व वाद मिटले, असे त्यांनी सांगितले.

याच सुमारास ट्रम्प आणि शी यांनी रशिया-युक्रेन संघर्ष सोडवण्यासाठी सहकार्यावरही चर्चा केली. अमेरिकेच्या अध्यक्षांनी सांगितले, की त्यांच्या संभाषणात तैवानचा मुद्दा आला नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की चीनने नेहमीच तैवानवर दावा केला आहे. अमेरिकेने मुख्य भूमी चीनपासून दूर असलेल्या या बेटाच्या स्वायत्ततेला पाठिंबा दिला आहे. म्हणूनच, चीनचे जिनपिंग ट्रम्प यांच्यासमोर तैवानचा मुद्दा उपस्थित करतील, अशी अपेक्षा होती. ट्रम्प आणि जिनपिंग यांच्यात सहा वर्षांनंतर भेट झाली. त्यांच्यात झालेली चर्चा आणि बैठकीचे एकूण निष्कर्ष पाहता जिनपिंग यांनी अमेरिका तसेच ट्रम्प यांना दाती तृण धरून शरण यायला लावले, असा अर्थ होतो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तसेच भारतावर ट्रम्प वारंवार टीका करत असताना भारताने कठोर उत्तर दिले नाही; परंतु चीनने ट्रम्प यांना सातत्याने कठोर उत्तर देऊन आपल्या अटींवर अमेरिकेला शरण यायला भाग पाडले. गेल्या सहा महिन्यांमध्ये हे दुसऱ्यांदा घडले आहे. अमेरिकेच्या 'टॅरिफ वॉर'ला चीनने अमेरिकेचे नाक दाबून उत्तर दिले. 'रेअर अर्थ मॅग्नेट'च्या निर्यातीवर बंधने आणली. त्याचा परिणाम अमेरिकेवर झाला. 'रेअर अर्थ मॅग्नेट'बाबत जगात चीनची मक्तेदारी आहे. अन्य देश ही मक्तेदारी मोडीत काढण्याचा आता प्रयत्न करत असले, तरी ते एका दिवसात साध्य होणार नाही. ट्रम्प यांना त्याची जाणीव झाली असावी. चीन जगभरातील 'रेअर अर्थ मॅग्नेट'चे ७० टक्के उत्पादन नियंत्रित करते. चीनने त्याला जागतिक शक्ती संतुलनाचे शस्त्र बनवले आहे. यामुळेच ट्रम्प यांना तडजोड करण्यास भाग पडले.

अमेरिकेचे संरक्षण आणि ऊर्जा-केंद्रित तंत्रज्ञान उद्योग या खनिजांशिवाय काम करू शकत नाहीत. अमेरिकेच्या सुप्रसिध्द एफ-३५ लढाऊ विमानात ४१८ किलो 'रेअर अर्थ मॅग्नेट' वापरले जाते. त्याचप्रमाणे, अमेरिकन नौदलाच्या आर्ले बर्क डीडीजी ५१ विनाशिकेत २,६०० किलो 'रेअर अर्थ मॅग्नेट' वापरले जाते. अमेरिकेच्या संरक्षणक्षेत्रातही हेच घडते. इतर उद्योगांनाही त्यांच्याशिवाय संघर्ष करावा लागतो. इलेक्ट्रिक वाहनांपासून स्मार्टफोनपर्यंत सर्व काही 'रेअर अर्थ मॅग्नेट'शिवाय अशक्य आहे. अमेरिकेची ही दुखरी नस चीनने दाबल्यामुळेच ट्रम्प चीनशी व्यापार करार करण्यासाठी पुढे आले. अमेरिकेच्या 'चिप युद्ध' आणि 'टॅरिफ वॉर'ला उत्तर म्हणून चीनने हे पाऊल उचलले. चीनने म्हटले होते, की त्यांच्या 'रेअर अर्थ मॅग्नेट' वापरणाऱ्या कोणत्याही कंपनी किंवा देशाला त्यांची परवानगी घ्यावी लागेल. या पार्श्वभूमीवर ट्रम्प आणि जिनपिंग यांच्यात सहा वर्षांनंतर बैठक झाली. दोन्ही एदेशांमधील व्यापार कराराच्या चौकटीअंतर्गत चीनने अमेरिकेला दुर्मिळ पृथ्वी खनिजांच्या निर्यातीवरची बंदी किमान एक वर्षासाठी पुढे ढकलण्याचे संकेत दिले आहेत. चीनी वस्तूंवर ट्रम्प यांनी लादलेली प्रस्तावित शंभर टक्के आयात शुल्क आता टळली आहे. ही घोषणा महत्त्वपूर्ण आहे. त्या बदल्यात चीन अमेरिकेकडून सोयाबीनची पुन्हा खरेदी सुरू करणार आहे आणि 'रेअर अर्थ मॅग्नेट'वरील निर्यात बंदी किमान एक वर्षासाठी पुढे ढकलण्यास तयार आहे.

सरत्या काळामध्ये चीनने 'रेअर अर्थ मॅग्नेट'चे उत्पादन आणि शुद्धीकरण याबाबत जगभरात धाक निर्माण केला. उर्वरित जग अमेरिकेच्या 'टॅरिफ वॉर'पुढे झुकले; परंतु चीन अविचल राहिला. यामुळे काही 'रेअर अर्थ मॅग्नेट' आणि कायमस्वरूपी चुंबक श्रेणीतील उत्पादनावरील निर्यात नियंत्रणे वाढली. संरक्षण, इलेक्ट्रिक वाहने, स्वच्छ सौर ऊर्जा उत्पादने आणि उच्च-तंत्रज्ञान उद्योगांवर याचा लगेचच परिणाम झाला. अमेरिकेने चीनच्या वर्चस्वापासून मुक्त होण्याचा प्रयत्न केला नाही किंवा करत नाही, असे नाही. ट्रम्प यांनी युक्रेनशी केलेल्या करारात आपल्यासाठी 'रेअर अर्थ मॅग्नेट'ना सुरक्षित करण्याकडे लक्ष केंद्रित केले होते. ट्रम्प हे या खनिजांचा पुरवठा सुरक्षित करण्यासाठी आशिया दौरा करत आहेत. जपान, मलेशिया, व्हिएतनाम आणि कंबोडियासोबतचे त्यांचे करार या संदर्भातील महत्वपूर्ण उदाहरणे म्हणून पाहिले जाऊ शकतात. तथापि, या घटकांच्या अंमलबजावणीसाठी बराच वेळ आणि पैसा लागेल. ही परिस्थिती लक्षात घेऊन चीनने ट्रम्प यांना त्यांच्या व्यापार धोरणांबाबत माघार घेण्यास भाग पाडले. परिणामी, अमेरिकेकडे दुसरा पर्याय नाही, ती चीनला दुखावू शकत नाही हे नव्याने सिध्द झाले. या घडामोडींमधून जागतिक व्यापार आणि राजकारण नवा धडा घेऊ शकणार आहे.

# पंचनाम्यानंतर शेतकऱ्यांच्या हातात काय

**वैभव पाटील**

सतत पडणाऱ्या पावसाने भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. शक्यतो ऑगस्ट महिन्यानंतर पाऊस कमी कमी होत जातो. परंतु सप्टेंबर अखेरीसही पावसाचा जोर कायम असल्याने रायगड जिल्ह्या म्हणजेच भाताचे कोठार असा लौकिक असलेल्या जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे शेतकऱ्यांना शेती करून फळ खायची वेळ आली अन अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हातचा घास हिरावून घेतला आहे. बळीराजाच्याला काय करावे सुचेनासे झाले आहे. अशी अवस्था कोकणातील शेतकऱ्यांची झाली आहे. रितसर पंचनामे होऊन गुंठावारी नुकसान भरपाई मिळावी असा मागणी आता जोर धरू लागली आहे.कारण कोकणातील बहुतांश शेतकऱ्यांची एकरी जमीन नाही अणि शासन तुटपुंजी एकरी वारी नुकसान भरपाई मंजूर करते. हा प्रकार शेतकर्यांच्या जखमेवर मीठ लावल्यासारखे आहे. शेतकऱ्यांच्या वर्षाच्या मेहनतीवर पावसाने पाणी फेरले असून कष्ट करून लावलेली काळ्या मातीतील भाताची रोपे अक्षरशः कोलमडून पडली असून, पिके पाण्याखाली गेली आहेत. सततच्या पावसाने झालेले नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न सुरू असताना पुन्हा आलेल्या पावसानेशेतकरीहवालदिलझालाआहे. जिल्ह्यात भातशेती ही फक्त उत्पन्नाचे साधन नसून घरगुती धान्य आणि शेतीची परंपरा जपण्यासाठी घेतली जाते, मात्र हेक्टरी लागणारा खर्च आणि मिळणारे उत्पादनाचा ताळमेळ नसताना नैसर्गिक आपत्तीने सर्व गणित कोलमडून टाकले आहे. कष्टातून मळा फुलवू पाहणारा शेतकरी राजा आर्थिक संकटात सापडला असून, कर्जफेड करणे कठीण झाले आहे. वर्षाची अरेसरी म्हणून लावलेली पिके नष्ट झाल्यामुळे उत्पन्नाचे स्रोत बंद झाले आहेत. शेतकरी चिंतेत सापडल्यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे, मात्र पंचनाम्यानंतर प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात कधी येईल असाही प्रश्न उपस्थित होत आहे. आपल्याकडे एक वाक्य प्रसिद्ध आहे. सभा संमेलनातून, सेमिनारातून, पेपरातून, अहवालातून सतत ते वाक्य म्हणजे, भारत हा कृषिप्रधान देश आहे. या वाक्याचा इतका वापर झाला आहे की, आता त्याचा अर्थ पुसट होत होत अगदी संपत गेला आहे. शासन आपले कायदे बनविताना, या कृषी प्रधानतेचा विचार करत नाही. आपण सतत कृषिप्रधानतेचा उल्लेख करत राहतो. गावागावातील कार्यकर्ते, स्थानिक नेते शेतकऱ्यांच्या नुकसानीची चर्चा करीत आहेत. तहसीलदारांना नुकसानीचे पंचनामे करण्यास सांगत आहेत. काहींनी पिकांचे विमा काढलेले आहेत. नुकसानीची भरपाईसाठी कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू आहे. वेगवेगळ्या कार्यालय, सरकारी कचेऱ्यामध्ये शेतकऱ्याच्या चकरा सुरू झाल्या. ही वस्तुस्थिती असूनही शेतकऱ्यांना आता त्यांच्या विम्याच्या पावत्या, सातबारा उतार्याचे झेरॉक्स अशी वेगवेगळी कागदपत्रे मागण्यात येतात. आज गुगल अर्थच्या सहाय्याने जगातील कोणत्याही कानाकोपर्यातील अगदी छोट्यातील छोट्या वस्तू, सजीव, त्यांच्या हालचाली शोधता येऊ शकतात. तंत्रज्ञान इतके पुढे गेलेले असताना शेतीमधील नुकसानीचा पंचनामा करण्याच्या गोष्टीवर वेळ घालवला जातो. प्रत्येक तालुक्यातील पावसाची आकडेवारी, शेतीतील पेरा, हे सगळे तपशील सरकार दरबारी असताना प्रत्येक शेतकऱ्यांला पंचनाम्याच्या नावाखाली एकटा पाडला जात आहे. अशा अनुत्पादक गोष्टीमध्ये वेळ आणि पैसा खर्च करून त्याचा आर्थिक बोझा कृषीखात्यावरच टाकला जाईल. यामध्ये अधिकारी आणि पदाधिकारी यांना चिरीमिरी खाण्यासाठी अवकाश उपलब्ध होईल. तात्कालिक उपाययोजना म्हणून आता पाऊस जास्त झालेल्या तालुक्यातील सरसकट सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जायला हवी. कोणत्या भागात किती पाऊस झाला, तेथील पेरा ध्यानात घेऊन नुकसानभरपाई देण्यासाबंधी शेतकरी हिताचे निकष तयार करावे. शेतकऱ्यांना स्वतः च्या जखमा दाखविण्यासाठी मजबूर केलं जाऊ नये. या तात्कालिक उपाययोजनांच्या पलीकडे शेती, शेतीप्रश्न, शेतीला प्रभावित करणारे वेगवेगळे घटक याबद्दल सतत लोकसहभागी धोरण आखणी करायला हवी. शेतीप्रधान देश असूनही शेतीची ही दयनीय अवस्था का झाली आहे, यासाठी एकदा शेती प्रश्नांचा पंचनामा करायला हवा. इतर मदत करण्याआधी खरडून गेलेली जमीन पूर्ववत करण्यासाठी शेतकरी माती मागतो आहे. पण त्याविषयी सरकार काहीच करायला तयार नाही. जगाचे पोट भरणारा शेतकरी आज भयंकर संकटात सापडला आहे. पाऊस अजूनही शेतकऱ्यांची पाठ सोडायला तयार नाही. सरकारने हजारो कोटींच्या नुकसानभरपाईची घोषणा केली. पण शेतकऱ्यांच्या खात्यावर किती पैसे जमा झाले हा प्रश्नच आहे. सरकार शेतकऱ्यांना केवळ खेळवत आहे. थोडक्यात शेतकऱ्यांच्या आत्ताच्या हालअपेष्टा तशाच राहणार, पुढच्या जूना गुळ सरकारने शेतकऱ्यांच्या कोपराला लावला आहे. आत्ता आवाज करायचा नाही, असेच बहुदा सरकारला सांगायचे असावे.

लोकसंसद

## दिल्ली स्फोटातील गुन्हेगारांच्या मुसक्या आवळा...



देशाची राजधानी दिल्लीत येथे झालेल्या शक्तिशाली स्फोटाने दिल्ली हादरली लाल किल्ल्यासमोरील एका कारमध्ये झालेल्या या स्फोटात किमान ९ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. २० जण जखमी झाले आहेत. कारमध्ये भीषण स्फोट होताच लागलेल्या आगीत आजूबाजूची सुमारे ३० वर वाहने जळून खाक झाली. हा स्फोट इतका भीषण होता की मृतदेहाच्या चिंधड्या उडाल्या. घटनास्थळावर रक्तमांसाचा चिखल झाला होता. सुरक्षा यंत्रणांनी घातपाताचा संशय व्यक्त केला असून, या भयंकर घटनेनंतर सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत. दिल्ली, गुरुग्रामसह देशभर हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्रासह अनेक राज्यांत अतिदक्षतेचे आदेश देण्यात आले असून, कडेकोट सुरक्षा तैनात केली आहे.या स्फोटात ९ जणांना प्राणास मुकावे लागले असून, हा आकडा वाढण्याची शक्यता आहे अनेक निष्पाप, निरागस लोकांना प्राण गमवावा लागला आहे त्यामुळे दिल्लीत झालेल्या स्फोटाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र, उत्तर प्रदेश हरियाणा, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. राजधानी दिल्लीत झालेल्या भीषण बॉम्बस्फोटानंतर त्याचे तीव्र पडसाद देशभरात उमटले असून, अनेक राज्यांमध्ये हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, बिहार, हरियाणा, केरळ या राज्यांसह केंद्रशासित प्रदेश चंदीगडमध्येही सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक करण्यात आली आहे. संवेदनशील ठिकाणी पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला असून, कसून तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले असले तरी. दिल्लीतील स्फोटानंतर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी देशातील प्रमुख राज्यांनी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे असून रेल्वे, बस स्थानके, बाजारपेठा आणि इतर गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा वाढवावी, संशयास्पद हालचालींवर बारीक नजर ठेवून सर्व शक्यतांचा विचार आणि सर्व बाजूंनी सखोल तपास करुन गृहमंत्रालयाने वेळीच यातील गुन्हेगारांच्या मुसक्या आवळाव्यात !

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

दिनविशेष

# जागतिक न्यूमोनिया दिवस



जागतिक न्यूमोनिया दिवस हा सार्वजनिक आरोग्य समस्या दूर करणायसाठी तसेच न्यूमोनियाचे गांभीर्य अधोरेखित करण्यासाठी आणि रोगाशी लढण्यासाठी मार्ग शोधण्यासाठी त्याचबरोबर अधिक संस्था/देशांना प्रोत्साहित करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. हा दिवस सर्वप्रथम ग्लोबल कोलिशन अगेन्स्ट चाइल्ड न्यूमोनियाद्वारे आयोजित करण्यात आला होता. जो समस्येचे निराकरण करण्यासाठी सार्वजनिक आणि राजकीय सहकार्य निर्माण करण्यात मदत करण्यासाठी तयार करण्यात आला होता. न्यूमोनिया हा जगातील सर्वात मोठा संसर्गजन्य विकार आहे. या करिता १२ नोव्हेंबर हा दिवस न्यूमोनियाविषयी जागरुकता करण्यासाठी जागतिक न्यूमोनिया दिन म्हणून पाळला जातो. जागतिक न्यूमोनिया दिनाचा उद्देश जगभरातील लोकांमध्ये न्यूमोनियाबद्दल जागरूकता पसरवणे हा आहे. संयुक्त राष्ट्रांनी १२ नोव्हेंबर २००९ रोजी पहिला जागतिक न्यूमोनिया दिवस जगभरात साजरा केला. दरवर्षी १०० हून अधिक संस्था एकत्र येऊन ग्लोबल न्यूमोनिया विरुद्ध ग्लोबल युतीफ्रं तयार करतात आणि न्यूमोनियाशी संबंधित मृत्यूंबद्दल जागतिक जागरूकता निर्माण करतात. जागतिक आरोग्य संघटना युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंड ने न्यूमोनिया आणि डायरियाबद्दल जागतिक जागरूकता निर्माण करण्यासाठी कृती योजना जाहीर केली होती. त्यांनी प्रत्येक १००० जीवांचे लक्ष्य ठेवले, मुलांमध्ये न्यूमोनियामुळे ३ पेक्षा कमी मृत्यू झाले.लहान मुलांमध्ये न्यूमोनियाच्या प्रतिबंधासाठी लसीकरण हाच एक सुरक्षित उपाय आहे. त्याशिवाय नवजात बालकांना पहिल्या सहा महिन्यांपर्यंत मातेने स्तनपान देणे, लहान मुलांच्या संपर्कात धूम्रपान टाळणे, तसेच मुलांना पोषक आहारासह प्रदूषण नसलेल्या मोकळ्या हवेत नेणे, याद्वारेही बालकांना होणारा न्यूमोनिया टाळण्यासाठी मदत होऊ शकेल, असे मत जागतिक न्यूमोनिया दिनानिमित्त वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले. न्यूमोनियामध्ये संसर्ग फुफ्फुसांमध्ये पसरतो आणि एक किंवा दोन्ही फुफ्फुसांवर परिणाम करू शकतो. हेल्थलाइन च्या वृत्तानुसार, न्यूमोनियामुळे फुफ्फुसातील हवेच्या पिशव्यांमध्ये सूज येते. आपल्या फुफ्फुसात बुडबुड्यांसारख्या अनेक लहान पिशव्या असतात, ज्यांना वैद्यकीय भाषेत आपण एल्वियोली म्हणतो. रक्तातील ऑक्सिजन विरघळवणे आणि शरीरातून कार्बन डायऑक्साइड काढून टाकणे हे या पिशव्यांचे काम आहे. निमोनियामुळे या पिशव्यांमध्ये हवा किंवा द्रव साचून सूज येऊ लागते. निमोनिया कोणालाही होऊ शकतो, जरी तो लहान मुले आणि वृद्ध लोकांमध्ये जास्त दिसून येत असला तरी. निमोनियाची लक्षण- हिवाळा येताच न्यूमोनियाचे रुग्णही झपाट्याने वाढतात. या रोगाची लक्षणे सौम्य ते गंभीर असू शकतात. त्याची लक्षणे मुख्यतः संक्रमणास कारणीभूत असलेल्या जंतूच्या प्रकारावर अवलंबून असतात. न्यूमोनियाची सौम्य लक्षणे साधारणपणे सर्दी किंवा फ्लूसारखीच असतात. जाणून घेऊया त्याची काही प्रमुख लक्षणे - श्वास घेताना छातीत दुखणे - खोकला तसेच कफाची समस्या - पटकन थकवा जाणवणे - अस्वस्थ वाटणे आणि घामासह ताप - उलट्या आणि मळमळ-अतिसार- अशक्त वाटणे- भूक न लागणे ही न्यूमोनियाची मुख्य कारणे आहेत-फुफ्फुसातील जिवाणू संसर्गामुळे न्यूमोनिया होतो. ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती खूप कमकुवत आहे अशा लोकांना हा आजार जास्त प्रमाणात होतो. अनेक प्रकारच्या जंतूंमुळे न्यूमोनिया होऊ शकतो. आपण श्वास घेतो त्या वातावरणात अनेक प्रकारचे जंतू असतात आणि आपली रोगप्रतिकारक शक्ती आपल्याला या जंतूंच्या संसर्गापासून वाचवते. परंतु, काहीवेळा हे जंतू आपल्या रोगप्रतिकारक शक्तीचाही पराभव करतात आणि फुफ्फुसात संसर्ग पसरवण्यास सुरुवात करतात.

**PUBLIC NOTICE**

This is to notify that Integrated Regional Office, Ministry of Environment, Forest & Climate Change (Forest Conservation Division), Government of India, Delhi, Letter 8-34/2022-FC I/78766/2024, Dated 02/08/2024 and 8-34/2022-FC I/113894/2025 Dated- 03/06/2025 accorded respectively In-principle (i.e. Stage-I) and Final (i.e. Stage-II) approvals for Diversion 263.5406 Ha. Acquired Forest Land for Sambarkund Medium Irrigation Project construction of Earthen Dam, Waste Weir, Tail Channel, PDN (Pipe Distribution Network), Approach Road and Rehabilitation for agriculture land, increase in GDP of the area leading to elevating Socio-Economic Status of Cultivators, Benefit to 33 villages of Alibag Taluka. Assured Drinking Water supply to nearby villages and Alibag Taluka, District Raigad in the State of Maharashtra in favour of Executive Engineer, Hetawane Medium Project Division Kamarli Tal. Pen Dist. Raigad. Further, Government of Maharashtra (Revenue and Forest Department) vide Government Order No.FLD-2022/C.R.294/F-10, Dated 06/11/2025 granted permission for Diversion of 263.5406 Ha. Acquired Forest land for construction of Sambarkund Medium Irrigation Project construction of Earthen Dam, Waste Weir, Tail Channel, PDN (Pipe Distribution Network), Approach Road and Rehabilitation work Village-Mahan, Taluka- Alibag, District- Raigad in the State of Maharashtra in favour of Executive Engineer, Hetawane Medium Project Division Kamarli Tal. Pen Dist. Raigad. This permission is granted subject fulfilment of the following terms/ conditions-

**As per the above GOI Letter dated 02/08/2024 & dated 03/06/2025**

**1. In-Principle/Stage-I (02.08.2024) Condition**

i. Legal status of the diverted forest land shall remain unchanged
ii. The user agency shall furnish a report from the State Dam Safety Organization (SDSO) regarding all technical aspects wrt the of the dam. The recommendations shall be implemented by the user agency to avoid any possible unforeseen conditions.
iii. Further, the State Government shall obtain approval of the National Dam Safety Authority (NDSA) on the recommendations made by the State Dam Safety Organization (SDSO) and submit the same before Stage II approval along with the compliance of Stage I approval conditions.
iv. The User Agency shall transfer the cost of raising and maintaining the compensatory afforestation at the prevailing wage rates as per compensatory afforstation scheme and the cost of survey, demarcation and erection of permanent pillars if required on the CA land shall be deposited in consultation with State Forest Department in the account of CAMPA of the concerned State through online portal. The CA will be maintained for 10 years. The scheme may include appropriate provision for anticipated cost increase for works scheduled for subsequent years.
v. The User Agency shall transfer the funds towards the cost of Net Present Value (NPV) of the forest land being diverted under this proposal in accordance with the guidelines in the matter.
vi. At the time of payment of the Net Present Value (NPV) at the present rate, the user agency shall furnish an undertaking to pay the additional amount of NPV, if so determined, as per the final decision of the Hon'ble Supreme Court of India.
vii. The non-forest land identified for Compensatory Afforestation shall be transferred and mutated in favour of the State Forest Department and notified by the State Government as Protected Forests under section 29 of the Indian Forest Act, 1927 or under the relevant section(s) of the local Forest Act, before issue of the 'Final' approval under the Adhiniyam. The Nodal Officer shall report compliance in this regard along with a copy of the original notification declaring the non-forest land as PF, along with compliance of 'in principle' approval.
viii. The copy of approved Catchment Area Treatment (CAT) Plan shall be submitted and the commensurate cost of CAT plan shall be deposited in the CAMPA account through online portal.
ix. The minimum water flow will be maintained in the downstream of river as per the conditions stipulated in the approval accorded by the Water Resource Department, Government of Maharashtra.
The user agency shall carry out muck disposal at pre-designated sites in such a manner so as to avoid its rolling down.
xi. The dumping area for muck disposal shall be stabilized and reclaimed by planting suitable species by the user agency at the cost of project under the supervision of State Forest Department. Retaining walls and terracing shall be carried out to hold the dumping material in place.
xii. The user agency shall provide free water for the forestry related projects.
xiii. The cost of felling of trees shall be deposited by the User Agency with the State Forest Department.
xiv. The State Government shall upload the KML files of the area under diversion and the accepted area for raising compensatory afforestation in the E-green watch portal of FSI, before handing over forest land to the user agency;
xv. All the funds received from the user agency under the project shall be transferred / deposited in CAMPA account only through e-portal (https://parivesh.nic.in/). Amount deposited through other mode will not be accepted as compliance of the Stage-I clearance.
xvi. Forest land will be handed over only after required non-forest land in the project is obtained by the user agency.
xvii. The felling of trees shall be restricted to FRL-4 meter only. Number of trees to be removed shall be kept at barest minimum during the execution of the project.
xviii. The User Agency shall restrict the felling of trees to minimum numbers in the diverted forest land and trees shall be felled under strict supervision of the State Forest Department.
xix. The user agency shall explore the possibility of translocation of maximum number of trees identified to be felled and shall ensure that any tree felling shall be done only when it is unavoidable and that too under strict supervision of the State Forest Department.
xx. The R&R Plan shall be implemented as per the R&R Policy of State Government in consonance with National R&R Policy, Government of India before the commencement of the project work and implementation. The said R&R Plan will be monitored by the State Government/Regional Office of MoEF & CC along with indicators for monitoring and expected observable milestones.
xxi. The User Agency shall obtain the Environment Clearance as per the provisions of the Environmental (Protection) Act, 1986, if required.
xxii. The User Agency shall undertake afforestation along the periphery of the reservoir.
xxiii. No labour camp shall be established on the forest land and the User Agency shall provide fuels preferably alternate fuels to the labourers and the staff working at the site so as to avoid any damage and pressure on the nearby forest areas.
xxiv. The boundary of the diverted forest land, shall be demarcated on ground at the project cost, by erecting four feet high reinforced cement concrete pillars, each inscribed with its serial number, distance from pillar to pillar and GPS coordinates.
xxv. The forest land proposed to be diverted shall under no circumstances be transferred to any other agency, department or person without prior approval of the Central Government;
xxvi. No damage to the flora and fauna of the adjoining area shall be caused;
xxvii. The layout plan of the proposal shall not be changed without the prior approval of the Central Government;
xxviii. No additional or new path will be constructed inside the forest area for the execution of this project.
xxix. The period of diversion under this approval shall be co-terminus with the period of lease to be granted in favour of the user agency or the project life, whichever is less.
xxx. The user agency in consultation with the State Government shall create and maintain alternate habitat / home for the avifauna, whose nesting trees are to be cleared in this project. Bird's nests artificially made out of eco-friendly material shall be used in the area, including forest area and human settlements, adjoining the forest area being diverted for the project.
xxxi. The concerned Divisional Forest Officer, will monitor and take necessary mitigative measures to ensure that there is no adverse impact on the forests in the surrounding area.
xxxii. The User Agency shall submit the annual self -compliance report in respect of the above stated conditions to the State Government, concerned Regional Office and to this Ministry by the end of March every year regularly.
xxxiii. The user agency shall comply all the provisions of the all Acts, Rules, Regulations, Guidelines, Hon'ble Court Order (s) and NGT Order (s) pertaining to this project, if any, for the time being in force, as applicable to the project.
xxxiv. Any other condition that the Ministry of Environment, Forests & Climate Change may stipulate from time to time in the interest of conservation, protection and development of forests & wildlife.
xxxv. Violation of any of these conditions will amount to violation of Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 and action would be taken as prescribed in para 1.16 of consolidated guidelines and clarifications issued under Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 as issued by this Ministry on dated 29.12.2023.
xxxvi. The compliance report shall be uploaded on e-portal (https://parivesh.nic.in/).

**2. Final Approval (03.06.2025) Condition**

i. Legal status of the diverted forest land will remain unchanged;
ii. The State Govt. shall ensure that the recommendations of the State Dam Safety Organisation (SDSO) and as concurred by the National Dam Safety Authority (NDSA) will be implemented by the user agency to avoid any possible unforeseen conditions;
iii. The Compensatory Afforestation shall be raised on identified non-forest land and the work for compensatory afforestation shall start within a period of two years from the date of issue of Final approval and maintained thereafter in accordance with the approved scheme at the cost of the user agency;
iv. The non-forest land transferred and mutated in favour of the State Forest Department or the revenue forest land, as the case may be, shall be notified by the State Government under the Indian Forest Act, 1927 or under the relevant section(s) of the local Forest Act, before handing over the forest land to the user agency;
v. The State Government has realized the NPV of the forest area diverted under this proposal from the User Agency, as per the orders dated 28.03.2008, 24.04.2008 and 09.05.2008 passed by the Hon'ble Supreme Court of India in Writ Petition (Civil) No. 202/1995 and the guidelines given under para 3 of the Chapter -3 of the Consolidate Guidelines and Clarifications issued under the Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 and Van (Sanrakshan Evam Samvardhan) Rules, 2023 published by the Ministry on 29.12.2023, the user agency shall pay the additional amount of NPV, if so determined, as per the final decision of the Hon'ble Supreme Court of India;
vi. The approved Catchment Area Treatment (CAT) Plan shall be implemented at the cost of user agency;
vii. The State Govt. shall ensure that the minimum water flow will be maintained in the downstream of river as per the conditions stipulated in the approval accorded by the Water Resource Department, Government of Maharashtra;
viii. The State Govt. shall ensure that the user agency shall carry out muck disposal at pre-designated sites in such a manner so as to avoid its rolling down;
ix. The State Govt. shall ensure that the dumping area for muck disposal shall be stabilized and reclaimed by planting suitable species by the user agency at the cost of project under the supervision of State Forest Department. 8-34/2022-FC I/113894/2025 Retaining walls and terracing shall be carried out to hold the dumping material in place;
x. The State Govt. shall ensure that the user agency shall provide free water for the forestry related projects;
xi. The State Govt. shall ensure that the forest land will be handed over only after required non-forest land in the project is obtained by the user agency;
xii. The State Govt. shall ensure that the felling of trees shall be restricted to FRL-4 meter only. Number of trees to be removed shall be kept at barest minimum during the execution of the project;
xiii. The State Govt. shall ensure that the User Agency shall restrict the felling of trees to minimum numbers in the diverted forest land and trees shall be felled under strict supervision of the State Forest Department;
xiv. The user agency shall explore the possibility of translocation of maximum number of trees identified to be felled and shall ensure that any tree felling shall be done only when it is unavoidable and that too under strict supervision of the State Forest Department;
xv. The R&R Plan shall be implemented as per the R&R Policy of State Government in consonance with National R&R Policy, Government of India before the commencement of the project work and implementation. The said R&R Plan will be monitored by the State Government/Regional Office of MoEF & CC along with indicators for monitoring and expected observable milestones;
xvi. The User Agency shall obtain the Environment Clearance as per the provisions of the Environmental (Protection) Act, 1986, if required;
xvii. The User Agency shall undertake afforestation along the periphery of the reservoir;
xviii. No labour camp shall be established on the forest land and the User Agency shall provide fuels preferably alternate fuels to the labourers and the staff working at the site so as to avoid any damage and pressure on the nearby forest areas;
xix. The boundary of the diverted forest land, shall be demarcated on ground at the project cost, by erecting four feet high reinforced cement concrete pillars, each inscribed with its serial number, distance from pillar to pillar and GPS coordinates;
xx. The forest land proposed to be diverted shall under no circumstances be transferred to any other agency, department or person without prior approval of the Central Government;
xxi. No damage to the flora and fauna of the adjoining area shall be caused;
xxii. The layout plan of the proposal shall not be changed without the prior 8-34/2022-FC I/113894/2025 approval of the Central Government;
xxiii. No additional or new path will be constructed inside the forest area for the execution of this project;
xxiv. The period of diversion under this approval shall be co-terminus with the period of lease to be granted in favour of the user agency or the project life, whichever is less;
xxv. The user agency in consultation with the State Government shall create and maintain alternate habitat/home for the avifauna, whose nesting trees are to be cleared in this project. Bird's nests artificially made out of eco-friendly material shall be used in the area, including forest area and human settlements, adjoining the forest area being diverted for the project;
xxvi. The concerned Divisional Forest Officer, will monitor and take necessary mitigative measures to ensure that there is no adverse impact on the forests in the surrounding area;
xxvii. The User Agency shall submit the annual self -compliance report in respect of the above stated conditions to the State Government, concerned Regional Office and to this Ministry by the end of March every year regularly;
xxviii. The user agency shall comply all the provisions of the all Acts, Rules, Regulations, Guidelines, Hon'ble Court Order (s) and NGT Order (s) pertaining to this project, if any, for the time being in force, as applicable to the project;
xxix. Any other condition that the Ministry of Environment, Forests & Climate Change may stipulate from time to time in the interest of conservation, protection and development of forests & wildlife;
xxx. Violation of any of these conditions will amount to violation of Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 and action would be taken as prescribed in para 1.16 of consolidated guidelines and clarifications issued under Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 as issued by this Ministry on dated 29.12.2023;
xxxi. The State Government and user agency shall ensure compliance to all conditions stipulated in the 'In-principle' approval letter of even no. dated 02.08.2024 for which undertakings have been obtained from the user agency and also the provisions of the all Acts, Rules, Regulations and Guidelines, relevant Hon'ble Court Order (S) and NGT Order (S), if any, for the time being in force, including compliance of the Schedule Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forests Rights) Act, 2006;
xxxii. As per Sub-rule 7 of Rule 11 of Van (Sanrakshan Evam Samvardhan) Rules, 2023 the State Govt. after receiving the 'Final' approval of the Central Government under sub-section (1) of section 2 of the Van (Sanrakshan Evam 8-34/2022-FC I/113894/2025 Samvardhan) Adhiniyam, 1980 and after fulfilment and compliance of the provisions of all other Acts and rules made thereunder, as applicable including ensuring settlement of rights under the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act, 2006 (2 of 2007), shall issue order for diversion of forest land.

**SCHEDULE**

| Sr. No. | Item Of Work / Purpose | Taluka | Village | Compt. No. | Survey No. | Gut No. | Area (In Ha.) | Status |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Submergence | Alibag | Mahan | 210 | | | 02-84-66 | Reserved Forest |
| | | | | 197 | | | 01-02-96 | |
| | | | | 199 | | | 08-94-74 | |
| | | | | 199 | | | 10-93-62 | |
| | | | | 200 | | | 03-35-14 | |
| | | | | 201 | | | 15-47-96 | |
| | | | | 201 | | | 00-79-24 | |
| | | | | 195 | | | 20-44-26 | |
| | | | | 196 | | | 62-97-74 | |
| | | | | 197 | | | 39-45-87 | |
| | | | | | 26/0 | 54 | 08-02-00 | Reserved Forest (IFA, 1927 U/S 4) |
| | | | | | 81/0 | 135 | 09-96-00 | |
| | | | | | 73/0 | 125 | 01-73-43 | |
| | | | | | 51/0 | 94 | 07-66-90 | |
| | | Alibag | Mahan | | 47/P | 91 | 07-79-53 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 54/0 | 98 | 01-18-00 | |
| | | | | | 57/0 | 103 | 00-37-00 | |
| | | | | | 109/1, | 177/P | 05-77-83 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 107/0 | 175 | 01-96-30 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 109/2 | 175 | 00-40-00 | |

(पान ६ वर)

(पान ५ वरुन)

| Sr. No. | Item Of Work / Purpose | Taluka | Village | Compt. No. | Survey No. | Gut No. | Area (In Ha.) | Status |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 68/0 | 110/P | 08-49-84 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 97/1B | 167 | 00-27-00 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 22/2 | 52/P | 01-26-00 | |
| | | | | | 22/1 | 53/P | 03-08-00 | |
| | | | | | 31/2/1 | 60 | 00-51-00 | |
| | | | | | 31/2/3, 31/2/4, 31/2/6 | 61/P | 00-54-00 | |
| | | | | | 31/2/5 | 62 | 00-30-00 | |
| | | | | | 31/4 | 71 | 00-27-00 | |
| | | | | | 97/1A | 168 | 01-06-00 | |
| | | | | | 97/2 | 169/P | 01-35-00 | |
| | | | | | 59/0 | 105 | 00-53-00 | |
| | | | | | 61/0 | 108 | 01-82-00 | |
| | | | | | 15/1C | 36 | 01-66-00 | |
| 2 | Submergence | Pen | Shihu | 211 | | | 04-92-98 | Reserved Forest |
| | | | | 210 | | | 01-03-15 | |
| 3 | Dam seat | Alibag | Mahan | 195 | | | 03-87-08 | Reserved Forest |
| | | | | | 109/1 | 177/P | 01-55-12 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 120/2 | 180/P | 00-07-08 | |
| | | | | | 120/3 | 178 | 01-16-00 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 15/5B | 32 | 00-16-00 | |
| | | | | | 15/2 | 33/P | 00-05-00 | |
| | | | | | 15/5/A | 34/P | 00-53-00 | |
| | | | | | 15/1B | 35/P | 00-11-14 | |
| | | | | | 9/6 | 28 | 00-52-00 | |
| | | | | | 15/4 | 31 | 00-03-00 | |
| | | | | | 15/5C | 27/P | 00-04-00 | |
| | | Alibag | Mahan | | 9/7 | 15/P | 00-20-78 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 15/3 | 24 | 00-03-00 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| 4 | Waste Weir | Alibag | Mahan | 201 | | | 05-09-21 | Reserved Forest |
| 5 | Tail Channel | Alibag | Mahan | | 115/0 | 185 | 00-16-20 | Restored To Owner U/S 22 A |
| | | | | | 120/7 | 186 | 00-79-00 | |
| 6 | Approach Road | Alibag | Mahan | | 120/20 | 199 | 00-14-84 | Of MPF Act 1975 |
| | | | | | 120/23 | 203 | 00-09-56 | |
| 7 | Approach Road | Alibag | Ramraj | | 54/0 | 112 | 02-60-29 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| 8 | Left Pipe Distribution Network | Alibag | Mahan | | 120/23 | 203/P | 00-09-54 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | Ramraj | | 54 | 112/P | 01-75-94 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 85/1 | 195/P | 00-84-98 | Finally Acquired Private Forest U/S 22 A MPF Act 1975 |

| Sr. No. | Item Of Work / Purpose | Taluka | Village | Compt. No. | Survey No. | Gut No. | Area (In Ha.) | Status |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 85/2 | 193/P | 00-04-71 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 116 | 282/P | 00-49-87 | |
| | | | Malade | | 7/12 | 13/P | 00-20-68 | Reserved Forest (IFA, 1927 U/S 4) |
| 9 | Right Pipe Distribution Network | Alibag | Mahan | | 9/7 | 15/P | 00-01-22 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 9/1 | 258/P | 00-06-33 | |
| | | | | | 145 | 246/P | 00-16-50 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 138/1 | 230/P | 00-01-83 | |
| | | | Moronde | | 3/1,3/2B, | 100/P | 00-14-89 | |
| | | | Umate | | 20/4 | | 00-02-35 | |
| | | | | | 42/P | | 00-30-27 | |
| | | | | | 43/P | | 00-02-69 | |
| | | | | | 49/P | | 00-32-69 | |
| | | | | | 13/P | | 00-46-23 | |
| | | | Borghar | | 54/P | 208/1,2 | 00-25-66 | |
| | | | | | 55/P | Forest | 00-62-00 | |
| | | | | | 59 | 214/P | 00-03-86 | |
| | | | Beloshi | | 190/2 | 454/P | 00-11-43 | |
| | | | | | 190/1 | 455/P | 00-10-42 | |
| | | | Mahajane | | 82/1/A | 294/P | 00-04-02 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 82/1B | 293/P | 00-03-26 | |
| | | | | | 74/3 | 287/P | 00-03-52 | |
| | | | | | 74/1 | 235/P | 00-08-94 | |
| | | | | | 63/0 | 223/P | 00-25-58 | Reserved Forest U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 71/1B | 190/P | 00-00-62 | |
| | | | | | 68/4 | 180/P | 00-06-46 | |
| | | | | | 8/0 | 25/P | 00-30-88 | Reserved Forest (IFA, 1927 U/S 4) |
| | | | | | 24/0 | 68/P | 00-17-33 | |
| | | | | | 44/0 | 179/P | 00-17-14 | |
| | | | | | 81/1 | 295/P | 00-28-74 | |
| | | | Valvali | | 70/2 | | 00-18-76 | Restored To Owner U/S 22 A Of MPF Act 1975 |
| | | | | | 66/P | | 00-19-20 | |
| | | | Malyan | | 20/1+2+3 | 83/P | 00-07-43 | |
| | | | | | 441/P | | 00-01-64 | Reserved Forest (IFA, 1927 U/S 4) |
| | Total forest Land (in Ha.) | | | | | | 263-54-06 | |

The above cited letter of In-principle & Final approval is available on Central Government website www.parivesh.nic.in and Government of Maharashtra Order is available on Government of Maharashtra's website www.maharashtra.gov.in with Reference No. 202511061555482419

Date: 13 / 11 /2025
Place: Kamarli, Tal.Pen

Sd/-
**Executive Engineer,**
Hetawane Medium Project Division,
Kamarli, Tal-Pen, Dist.- Raigad.

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/२४८/१५८०/२०२५**

# खारघरमधील शाळा, मॉल पत्त्यावर बोगस मतदारांची नावे

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचा आरोप

**। पनवेल । वार्ताहर ।**

खारघरमधील मतदारांची नावे खाजगी शाळा, रुग्णालय आणि मॉल या पत्त्यावर नोंदणी झाल्याचे दिसून येत असून, सदर सर्व मतदार बोगस मतदार असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेना खारघर पदाधिकारी गणेश बनकर यांनी केला आहे.



खारघर परिसरातील काही मतदारांच्या नावासमोर फोटो नसल्याचे, घर अथवा सोसायटीचा पत्ता नसल्याचे तसेच एका सोसायटीच्या नावाखाली दुसऱ्या सोसायटीमधील मतदारांची नावे असल्याचे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या पडताळणीत समोर आले होते.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी गणेश बनकर यांनी केलेल्या पडताळणीत खारघरमधील संजीवनी स्कूल, लिटिल वर्ल्ड मॉल, आरोग्य रुग्वालय आणि काही सोसायटींच्या पत्त्यावर बोगस मतदारांची नावे नोंदविण्यात आल्याचे उघड झाले आहे.

मतदार नोंदणी करताना शाळा आणि मॉल यांचे प्लॉट क्रमांक चुकीचे नमूद करण्यात आले आहेत. मतदार यादीत बोगस नावे टाकणाऱ्यांचे मोठे रकेट असून, निवडणूक आयोगाने वेळीच संजीवनी स्कूल, लिटिल वर्ल्ड मॉल, आरोग्य रुग्णालय आणि काही सोसायटींच्या पत्त्यावर नोंदविण्यात आलेली बोगस मतदारांची नावे मतदार यादीतून वगळावीत, अशी मागणी गणेश बनकर यांनी केली आहे.

# ओबीसी महिला आरक्षणामुळे प्रभागांसाठी उमेदवार शोधाशोध

**खोपोली :** सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीनंतर नगरपालिका निवडणुकीसाठी ओबीसी आरक्षणाची सोडत काढण्यात आली. नागरिकांचा मागास प्रवर्ग चार, अनुसुचित जाती दोन, सर्वसाधारण दहा असे एकूण १६ जागांसाठी महिला आरक्षण तर नागरिकांच्या मागास प्रवर्ग चार, अनुसुचित जाती एक, सर्वसाधारण नऊ, अनुसुचित जमातीसाठी एक असे एकूण १५ जागांसाठी पुरूष आरक्षण जाहिर झाले आहे. सर्वच राजकीय पक्षाच्या इच्छुक उमदेवारांनी दुसरा प्रभाग शोधून काम सुरू केले असले तरी ओबीसी महिला आरक्षण पडलेल्या प्रभागात अजित पवारांच्या राष्ट्रवादीला उमेदवार मिळत नसल्याने पॅनलच्या उमेदवारांची चांगली गोची झाली आहे तर शिंदेंच्या शिवसेनेत ओबीसी महिला उमेदवारांची गर्दी असल्यामुळे उमेदवारी मिळाली नाहीतर नाराज उमेदवारांना पक्षात घेण्यासाठी भाजप गळ टाकून बसल्याची चर्चा आहे. नगर परिषदेच्या ३१ पैकी सोळा जागा महिलासांठी तर फक्त पंधराच जागा पुरूषांसाठी आरक्षित करण्यात आल्याने इच्छुकांच्या दांड्या उडल्या आहेत. अनेक इच्छुक उमेदवारांनी पक्षविरहीत अंतर्गत पॅनल करून निवडणूक लढण्याची सेटींग केली होती.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१२ नोव्हेंबर**

१) श्री. रमेश भास्कर नाईक
वरसोली, अलिबाग,
१२-११-१९४२

२)श्रीम.स्मिता आरूण दांडेकर
गुरव नगर, अलिबाग
१२-११-१९४८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे पाथरज ता. कर्जत जिल्हा रायगड येथिल खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील अनिल सोलंकी हे प्रदिप पंढरीनाथ विचारे या विद्यमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं हिस्सा नं | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ६३/३/अ/१२ | ०-२०-१० गुंठे | ०-१८ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क, पोटगी, लीज, चार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत नोंदवावी .सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
१२/११/२०२५
मो. नं ९२८४६७७५१६

आशीलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो. कोंदीवडे ता. कर्जत
जि. रायगड ४१०२०१

## E-TENDER NOTICE

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-15/25-26/ Rfx No.7000038051 | Supply of Tripping coil & Closing coil for various makes of CB at various s/s under 400 KVR.S. (O&M) Division Nagothane... **2nd call** | **Rs. 4,61,714.41/-** | **21.11.2025 up to 23.59 hrs** |

**EMD :** Rs. Rs. 5000/-, **Tender fee :** Rs. 500/- + GST. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635
**Email ID: ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**
**(सामान्य प्रशासन विभाग) कुंटेबाग, रायगड जिल्हा परिषद,**
**प्रशासकिय इमारत, अलिबाग, जि.रायगड, पिनकोड-४०२२०१**
Email-bdoraigad@gmail.com **दुरध्वनी क्र. ०२१४१-२२२०८२**

जा.क्र.राजिप/साप्रवि/लेखा-२/ /२०२५ दिनांक:-१०/११/२०२५

**ई-निविदा सन २०२५-२६** (१Call )
**(ई-निविदा सुचना क्रमांक-१/२०२५)**

मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग हे सामान्य प्रशासन विभाग रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचे कडील खालील कामांची निविदा योग्य त्या नोंदणीकृत वाहन पुरवठादारांकडून (Percentage Tender) दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. तरी खालील निविदा बाबतची सर्व माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम रू | टेंडर रक्कम रू. | इसारा रक्कम १% प्रमाणे | आवश्यक कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|
| १. | रायगड जिल्हा परिषद अलिबाग खुला अंतर्गत पंचायत समिती साठी १२ नग ७ आसनी वाहने खरेदी करणे (Mahindra Bolero or Equivalent vehicle for Zilla Parishad Office) | १,४४,००,०००/- | १०००/- | १,४४,०००/- | खुला |

सही/-
**नेहा भोसले (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नं. १५७, एकूण क्षेत्र ०-०५-१० हे. आर., आकार १.०६ रू.पै. ही भातशेती मिळकत, तसेच या मिळकतीतील ग्रामपंचायत किहीम हद्दीतील मालमत्ता क्र. २२०, क्षेत्र १२५.८३ चौ. फुट ही घर मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक लक्ष्मीधर एकनाथ सावजी, रा.ई ५०५, शिवशंभो को. ऑप. हौ. सोसायटी, सी-वुड कॉम्प्लेक्स, गोराई-३, बोरिवली -पश्चिम, मुंबई ४०००९१ यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ११/११/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशील यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १/२० | ०.०५.०० | ०.०३ |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखतद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचविणे. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. १२/११/२०२५

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड, संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## जाहीर नोटीस

आमचे मार्फत खालील वर्णन शेतजमिन मिळकतीबाबत दिनांक ०७/११/२०२५ रोजी कृषीवल या वर्तमान वृत्तपत्रामध्ये विक्री बाबत जाहीर नोटीस देण्यात आलेली असून सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३४/३ | एकूण क्षेत्र ४-०७-०० हे.आर. | ३.४० |

सदर मिळकतीबाबत दिनांक ७/११/२०२५ रोजी कृषीवल या वर्तमान वृत्तपत्रामध्ये विक्री बाबत प्रसिद्ध करण्यात आलेली जाहीर नोटीस आमच्यामार्फत नजर चुकीने प्रसिद्ध केली असून आज रोजी या नोटीसने रद्द करण्यात येत आहे.

दिनांक :- १२/११/२०२५

सही
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## ग्रुप ग्रामपंचायत सानेगाव

मु. यशवंतखार पो- सानेगाव ता. रोहा, जि.रायगड
निविदा सूचना
टक्केवारी दराची

ग्रुप ग्रामपंचायत सानेगाव ता. रोहा, जि. रायगड यांच्याकडून जन सुविधा योजना/नागरी सुविधा योजना २०२५-२०२६ अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी नोंदणीकृत ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मंजूर संस्था यांचेकडून टक्केवारी दराची लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. निविदा दिनांक: १२/११/२०२५ ते १९/११/२०२५ या कालावधीत सुट्टीचा दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयात पाठवाव्यात पोस्टाने आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. तसेच अपूर्ण निविदा उशिरा आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. निविदा दिनांक: २०/११/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच अध्यक्षतेखाली उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचा प्रकार | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | यशवंत खार येथे अंतर्गत रस्ता बांधणे. | जनसुविधा | ३०००००/- | १% | २००रु | ६ महिने |
| २ | यशवंतखार येथे संरक्षण भिंत बांधणे | नागरी सुविधा | ५०००००/ - | १% | २००रु | ६ महिने |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे-**
१) निविदा दि. १२/११/२०२५ ते १९/११/२०२५ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील व २०/११/२०२५ रोजी मा. सरपंच सानेगाव यांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील.
२) प्रत्येक निविदा स्वतंत्र असावी व सोबत GST प्रमाणपत्र, पॅनकार्ड, सुशिक्षित बेरोजगार अभियंता प्रमाणपत्र एकाच खोट्यात असावे.
३) ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
४) निविदा फॉर्म फी परत मिळणार नाही.
५) काम करणेपूर्वी जागेवरचा फोटो व काम पूर्ण झाल्यावरचा फोटो ठेकेदाराने दिल्याशिवाय कामाचे बिल अदा केले जाणार नाही.
६) काम मंजूर झाल्यावर ठेकेदाराने रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदारासह स्वखर्चाने करारनामा करून द्यावा लागेल.
७) काम पूर्ण झाल्यावर ठेकेदाराने कामाची माहिती दर्शविणारा बोर्ड जागेवर लावणे आवश्यक आहे.
८) कामाची देखरेख पंचायत समितीच्या तांत्रिक इंजिनियर यांच्या आदेशाप्रमाणे व आराखड्याप्रमाणे होणे बंधनकारक आहे.
९) ठेकेदाराच्या बिलातून GST, सुरक्षा अनामत, रॉयटी सरचार्ज, तसेच अन्य कापती शासनाच्या नियमानुसार करण्यात येतील.
१०) ग्रामपंचायतीकडे जसा निधी उपलब्ध होईल तसा ठेकेदाराला देण्यात येईल त्याची कोठेही तक्रार करता येणार नाही.
११) काम पूर्ण झाल्यापासून ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल.
१२) ठेकेदार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे. PFMS प्रणालीशी सलग्न असावे.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत सानेगांव**
**ता. रोहा, जि. रायगड.**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मौजे बामणगांव, ता. अलिबाग येथील मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अनु. | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| १. | बामणगांव | १६१ | ०-०७-५० पो.ख.०-०१-३० ०-०८-८० | १.८१ | श्री. नंदकिशोर हरिश्चंद्र तुणतुणे. |
| २. | बामणगांव | २१६ | ०-७८-९० पो.ख.०-१४-४० ०-९३-३० | २.१८ | १) श्री.रमेश रामचंद्र कुंटे. २) सौ.अमृता अभिजीत धारप, ३) श्री. निखिल विश्वनाथ कुंटे, ४) श्रीम.वसुधा विश्वनाथ कुंटे. |
| ३. | बामणगांव | ३११/२ | ०-२३-१० पो.ख. ०-०५-६० ०-२८-७० | ०.६२ | १) सौ. सुरेखा गोपाळ जोग, २) सौ.वंदना विजय केतकर, |

सदरच्या मिळकती ह्या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती ह्या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यामध्ये कुणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क अधिकार नाही, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १२/११/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील.**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता.अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

**अंदाजपत्रक बनविणेकामी दरपत्रक**

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | दरपत्रक/पमपा/शिक्षण /२०२५ | एकात्मिक शैक्षणिक व्यवस्थापन संसाधन नियोजन प्रणाली आणि अध्यापन व्यवस्थापन व्यासपीठची खरेदी व अंमलबजावणीबाबत. |

या निविदेबाबतची माहिती वृत्तपत्रात/पनवेल मनपाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. १२/११/२०२५ ते दि.१८/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत शिक्षण विभाग, पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग (लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय,) येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात प्राप्त होईल याची संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**शिक्षणाधिकारी**
**शिक्षण विभाग**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यात येत आहे की मौजे मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत सर्व्हे नं.१/१/अ प्लॉट नं. ३ चे मालक निशीगंधा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित मुद्रे बुद्रुक ता. कर्जत, ची मालमत्ता विकसित करण्याकरीता जाहीर नोटीस.

**मौजे मृद्रे बुद्रुक, तालुका कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत-**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र आर चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| निशीगंधा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित | १/१/अ | ३ | ५०६.५१ | १०.१५ |

सदरची बिनशेती मिळकत निशीगंधा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांनी पूर्नविकसित करावयाचे ठरविले आहे. सदर सोसायटीची पूर्नबांधणीसाठीची सर्वसाधारण सभा दिनांक १४/०९/२०२५ रोजी झालेली आहे. तरी सदर बिनशेती मिळकतीच्या पुर्नविकासासाठी निशीगंधा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांस कडून नामांकित बिल्डर आणि डेव्हलपर्स यांच्याकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी सर्व बांधकाम व्यवसायिकांनी त्यांचे प्रस्ताव ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत संस्थेच्या कार्यालयात सादर करावे.

दि. १२/११/२०२५

सचिव अध्यक्ष
**निशीगंधा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
(पत्ता निशीगंधा सहकारी गृहनिर्माण सोसायटी रेव्हेन्यू कॉलनी, मुद्रे बुद्रुक ता. कर्जत, जि. रायगड)

## ग्रुप ग्रामपंचायत भातसई

**मु. भातसई, पो. शेणवई, ता. रोहा, जि. रायगड**

**दि. ११-११-२०२५**

**निविदा सूचना**
**टक्केवारी दराची**

ग्रुप ग्रामपंचायत भातसई ता. रोहा, जि.रायगड यांच्याकडून १५ वा वित्त आयोग/जन सुविधा योजना २०२५-२०२६ अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी नोंदणीकृत ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मंजुर संस्था यांचेकडून टक्केवारी दराची लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. निविदा दिनांक : १२/११/२०२५ ते १९/११/२०२५ या कालावधीत सुट्टीचा दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयात पाठवाव्यात. पोस्टाने आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. तसेच अपूर्ण निविदा उशिरा आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. निविदा दिनांक २०/११/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच अध्यक्षतेखाली उघडण्यात येतील

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचा प्रकार | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | झोळांबे नळ पा.पु.योजना दुरुस्ती | बंधित | ८००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| २ | झोळांबे विहिरीला जाली बसविणे | बंधित | ८००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| ३ | पालेतर्फे अष्टमी येथे नाल्याला संरक्षण भिंत बांधणे | बंधित | १०००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| ४ | कावेची वाडी येथे विहिरी दुरुस्ती | बंधित | ७००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| ५ | भातसई येथे तलाव विहिरी दुरुस्ती | बंधित | ८००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| ६ | भातसई येथे नळ पाणीपुरवठा योजना दुरुस्ती | बंधित | ८००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| ७ | झोळांबेवाडी येथे नळपाणीपुरवठा योजना दुरुस्ती करणे | बंधित | ११००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| ८ | झोळांबेवाडी येथे शाळा मंदिर सभोवताली सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन करणे. | बंधित | १०००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| ९ | वरवडे गटार बांधणे | बंधित | १०००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| १० | कावेचीवाडी येथे गटार बांधणे | बंधित | ६००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| ११ | भातसई येथे गटार नाल्याला भिंत बांधणे | बंधित | १६००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| १२ | झोळांबे येथे सांडपाणी व्यवस्थापन करिता काम करणे. | बंधित | ६००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| १३ | ग्रामपंचायत हद्दीत वैयक्तीक सार्व. कचरा कुंडी खरेदी करणे. | बंधित | ७००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| १४ | ग्रामपंचायत हद्दीत सांडपाणी व्यवस्थापन शोषखड्डे बांधणे. घनकचरा व्यवस्थापनकरिता कंपोस्ट खड्डे उभारणे | बंधित | ७६९००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| १५ | पालेतर्फे अष्टमी येथे रा.जि.प.शाळा दुरुस्ती करणे. | अबंधित | ६००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| १६ | कावेचीवाडी येथे अंगणवाडी डीजीटल करणे | अबंधित | ४००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| १७ | झोळांबेवाडी येथे आवश्यकतेनुसार खेळाचे साहित्य पुरविणे | अबंधित | ७००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| १८ | आदिवासीवाडी येथे झोळांबे स्मशानभूमी दुरुस्ती करणे | अबंधित | ७००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| १९ | वरवडे बौद्धवाडी येथे समाजमंदिर दुरुस्ती करणे | अबंधित | ३००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| २० | भातसई बौद्धवाडी येथे बौद्धविहार दुरुस्ती करणे | अबंधित | ७००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| २१ | आदिवासीवाडी भातसई येथे रस्ता करणे | अबंधित | ७००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| २२ | ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणे. | अबंधित | २०००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| २३ | कावेचीवाडी येथे सार्व. शौचालय बांधकाम करणे. | अबंधित | ५०२८०/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| २४ | मौजे कावेचीवाडी येथे स्मशान चौथरा शेड बांधणे | जनसुविधा | ५०००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |
| २५ | मौजे लक्ष्मीनगर येथे रस्ता तयार करणे, ग्रा.पं. भातसई | जनसुविधा | ३०००००/- | १% | २०० रु. | ६ महिने |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे-**
१) निविदा दि. १२/११/२०२५ ते १९/११/२०२५ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील व २०/११/२०२५ रोजी मा. सरपंच भातसई यांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील.
२) प्रत्येक निविदा स्वतंत्र असावी व सोबत GST प्रमाणपत्र, पॅनकार्ड, सुशिक्षित बेरोजगार अभियंता प्रमाणपत्र एकाच खोट्यात असावे.
३) ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
४) निविदा फॉर्म फी परत मिळणार नाही.
५) काम करणेपूर्वी जागेवरचा फोटो व काम पूर्ण झाल्यावरचा फोटो ठेकेदाराने दिल्याशिवाय कामाचे बिल अदा केले जाणार नाही.
६) काम मंजूर झाल्यावर ठेकेदाराने रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदारासह स्वखर्चाने करारनामा करून द्यावा लागेल.
७) काम पूर्ण झाल्यावर ठेकेदाराने कामाची माहिती दर्शविणारा बोर्ड जागेवर लावणे आवश्यक आहे.
८) कामाची देखरेख पंचायत समितीच्या तांत्रिक इंजिनियर यांच्या आदेशाप्रमाणे व आराखड्याप्रमाणे होणे बंधनकारक आहे.
९) ठेकेदाराच्या बिलातून GST, सुरक्षा अनामत, रॉयटी सरचार्ज, तसेच अन्य कापती शासनाच्या नियमानुसार करण्यात येतील.
१०) ग्रामपंचायतीकडे जसा निधी उपलब्ध होईल तसा ठेकेदाराला देण्यात येईल त्याची कोठेही तक्रार करता येणार नाही.
११) काम पूर्ण झाल्यापासून ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल.
१२) ठेकेदार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे. PFMS प्रणालीशी सलग्न असावे.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत, भातसई**
**ता. रोहा, जि. रायगड.**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे बापवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट नं. १५३ एकूण क्षेत्र ००-६५-३०, आकार २.१९, इतक्या क्षेत्राची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम. चंद्रभागा ऊर्फ सोनीबाई पांडुरंग बांद्रे, राहणार मु.बापवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड. यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांन सोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (सात) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाराहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : ११/११/२०२५

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S.LL.B
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती खालील जमीन मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे-तमनाथ, ता. कर्जत, जि. रायगड.**

| अ. क्र. | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | ३७/४ | ०.४२.२० ०.००.५० एकूण ०.४२.७० हे.आर.पॉ. | ८.०७ | श्री. प्रभाकर शंकर भोईर |
| २. | ३७/५ | ०.४२.३० ०.०२.०० एकूण ०.४४.३० हे.आर.पॉ. | ७.४४ | श्री. प्रदिप अशोक भोईर |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून, आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १२/११/२०२५

सही /-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं.१५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत, जि.रायगड -४१०२०१.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## महिला क्रिकेटचा उगवता तारा वैष्णवी माणकर



क्रिकेट हा भारताचा आत्मा मानला जातो. पुरुष क्रिकेटपटूंनी आजवर देशाला गौरव मिळवून दिला, पण आता महिला क्रिकेटपटू देखील मैदानावर चमकत आहेत. महाराष्ट्राच्या मातीतून अशाच एका तेजस्वी क्रिकेटपटूचा उदय झाला आहे वैष्णवी पृथ्वीराज माणकर. विकेटकीपर म्हणून प्रसिद्ध झालेल्या वैष्णवी यांनी आपल्या जिद्दी, मेहनत आणि चपळाईच्या बळावर राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर आपले नाव कोरले आहे.

**बालपण आणि शिक्षण :** वैष्णवी माणकर या सांगली जिल्ह्यातील आष्टा गावच्या सुपुत्री आहेत. त्या सांगली जिल्ह्यातील आष्टा तालुक्याचे दिवंगत आमदार विलासराव शिंदे यांची नात, जिल्हा बँकेचे सदस्य वैभव शिंदे व माजी पंचायत समिती उपसभापती भाग्यश्री शिंदे यांची सुकन्या तसेच माणगाव शहरातील ज्येष्ठ विधिज्ञ तथा शिवसेना शिंदे गटाचे माणगाव तालुका प्रमुख ॲड.महेंद्र माणकर यांच्या सुनबाई आहेत. घरातील शिस्त, प्रोत्साहन आणि खेळाविषयी असलेली ओढ यामुळेच वैष्णवींचा प्रवास सुरू झाला. सध्या त्या एम.ए. इंग्रजी या विषयात उच्च शिक्षण घेत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करत असतानाच त्यांनी क्रिकेटची आवड सातत्याने जोपासली. शिक्षण आणि खेळ यांचा उत्तम समतोल राखणाऱ्या वैष्णवी या आजच्या तरुणींसाठी आदर्श आहेत.

**क्रिकेट प्रवासाची सुरुवात :** वैष्णवींचा क्रिकेट प्रवास २०१३ मध्ये सुरू झाला. तेव्हा त्या केवळ ११ वर्षांच्या होत्या. त्या वयात बॅट आणि ग्लोव्हज हातात घेऊन त्यांनी स्वप्नांच्या दिशेने पहिले पाऊल टाकले.

**श्री. सलीम शेख**



सुरुवातीपासूनच विकेटकीपिंग या विशेष कौशल्यामुळे त्या इतरांपेक्षा उठून दिसल्या. दररोजच्या नेट्समधील अथक सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि खेळाप्रती निष्ठा यामुळे त्यांनी आपले कौशल्य अधिकाधिक धारदार केले. परिणामी, अल्पावधीतच जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय संघांमध्ये त्यांना स्थान मिळाले.

**विकेटकीपिंगमधील कौशल्य :** विकेटकीपिंग ही क्रिकेटमधील अत्यंत जबाबदारीची आणि कठीण भूमिका आहे. सेकंदाच्या आत निर्णय घेणे, फलंदाजाला झेलबंद करणे, स्टंपिंग करणे, तसेच प्रत्येक क्षणी सजग राहणे हे सर्व विकेटकीपरकडून अपेक्षित असते. वैष्णवींची हीच चपळाई, निर्णयक्षमता आणि सातत्यपूर्ण तयारी यामुळे त्या संघाच्या मागील बाजूस भक्कम आधारस्तंभ ठरल्या आहेत. त्याचबरोबर फलंदाजीतही त्यांनी संघाला अनेकदा महत्त्वाचे योगदान दिले आहे.

**उल्लेखनीय कामगिरी :**

वैष्णवींच्या यशाची नोंद घेता काही बाबी विशेषत्वाने ठळक होतात.

- त्यांनी १९ ते २३ वयोगटातील विविध स्पर्धांमध्ये निवड मिळवून आपली उपयुक्तता सिद्ध केली.
- जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय तसेच आंतरराज्यीय स्पर्धांमध्ये त्यांचे योगदान मोलाचे ठरले.
- विकेटकीपिंगबरोबरच फलंदाजीत त्यांनी अनेकदा संघासाठी महत्त्वपूर्ण धावा केल्या.
- त्यांच्या कामगिरीची दखल घेत वरिष्ठ खेळाडू व प्रशिक्षकांनी त्यांचा गौरव केला.

**संघर्षातून यशाकडे :**

वैष्णवींचा प्रवास सोपा नव्हता. ग्रामीण भागातील मुलींना खेळात संधी मिळणे तितकेसे सोपे नाही. समाजातील परंपरा, मर्यादा आणि सुविधांचा अभाव या सगळ्यांवर मात करीत त्यांनी स्वतःची वाट निर्माण केली.

त्यांच्या प्रत्येक यशामागे अथक परिश्रम आणि जिद्दीची कहाणी दडलेली आहे. त्यांनी सिद्ध करून दाखवले की

जर स्वप्न मोठं असेल आणि मेहनत प्रामाणिक असेल, तर कोणतीही शिखरे गाठता येतात.

**समाजातील प्रेरणादायी भूमिका :**

वैष्णवींचे यश हे केवळ वैयक्तीक नाही, तर सामाजिक दृष्ट्याही महत्त्वाचे आहे. त्यांच्या कामगिरीमुळे आज अनेक तरुणींना क्रिकेटसारख्या खेळात सहभागी होण्याची प्रेरणा मिळत आहे. ग्रामीण भागातील मुलींनाही मोठ्या उंचीवर पोहोचता येते हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्या केवळ खेळाडू नाहीत, तर भावी पिढीसाठी प्रेरणादायी व्यक्तीमत्त्व आहेत.

**भविष्यातील ध्येय :** वैष्णवींचे ध्येय स्पष्ट आहे भारतीय महिला क्रिकेट संघात स्थान मिळवून देशासाठी खेळणे. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे आणि विकेटकीपिंगमधील अप्रतिम कौशल्यामुळे त्या नक्कीच आपल्या स्वप्नांच्या शिखरावर पोहोचतील. महाराष्ट्रासोबतच संपूर्ण भारताला त्यांचा अभिमान वाटेल, असा विश्वास सर्वत्र व्यक्त केला जात आहे.

**निष्कर्ष :** वैष्णवी पृथ्वीराज माणकर यांचा क्रिकेट प्रवास हा संघर्ष, मेहनत आणि चिकाटीचे उत्तम उदाहरण आहे. शिक्षण आणि खेळ यांचा समतोल साधत त्यांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. आज त्या केवळ एक विकेटकीपर नाहीत, तर अनेक मुलींसाठी स्वप्नांची दिशा दाखवणारा दीपस्तंभ आहेत. त्यांचे यश हे समाजातील प्रत्येक तरुणीला सांगते स्वप्ने बघा, ध्येय ठेवा आणि त्यासाठी लढा. यश नक्की मिळेल.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघाचे माननीय आमदार रोहित पवार यांच्या अथक प्रयत्नामुळे महाराष्ट्रातल्या अनेक क्रीडा युवक-युवतींना मोलाचे सहकार्य लाभले आहे व त्यांना आपल्या क्रिकेट कारकिर्दीमध्ये प्रगती करण्यास मदतही होऊ लागली आहे.

आगामी काळात भारतीय महिला क्रिकेट संघात वैष्णवी चे नाव झळकताना पाहणे ही केवळ अपेक्षा नाही, तर खात्री आहे. महाराष्ट्राची ही कन्या देशाचे नाव जागतिक पातळीवर उज्वल करेल, याबद्दल कोणतीही शंका नाही. नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित महाराष्ट्र वुमन्स प्रीमियर लीगमध्ये विजेत्या पुणे वॉरियर संघाकडून खेळताना वैष्णवीने यष्टीरक्षक म्हणून बहारदार कामगिरी करत अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे व संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट महिला संघातून सांगलीच्या स्मृती मंधना पाठोपाठ सांगलीतल्या अनेक महिला क्रिकेटर चमकत असून त्यात वैष्णवीचे नाव अग्रक्रमावर आहे.

# दिल्लीत नेहरू स्टेडियम पाडून क्रीडानगरी

## क्रीडा मंत्रालयाकडून नूतनीकरणाचा प्रस्ताव

**| नवी दिल्ली| वृत्तसंस्था |**

**आशियाई आणि राष्ट्रकुलसारख्या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे यजमानपद भूषविलेले राजधानी नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू स्टेडियम आता नामशेष होणार असून, त्या जागी सर्व अत्याधुनिक सुविधांसह एक सुसज्ज क्रीडानगरी उभारण्याचा प्रस्ताव क्रीडा मंत्रालयाने ठेवला आहे. विशेष म्हणजे, २०१०च्या राष्ट्रकुल स्पर्धेपूर्वी तब्बल ९६१ कोटी रुपयांचा खर्च करून या स्टेडियमचे नूतनीकरण करण्यात आले होते.**



नेहरू स्टेडियम १०२ एकर जागेत उभे आहे. या परिसरात अनेक क्रीडामैदानांसह राष्ट्रीय उत्तेजक प्रतिबंधक संस्था (नाडा), राष्ट्रीय उत्तेजक चाचणी प्रयोगशाळा (एनडीटीएल), भारतीय क्रीडा प्राधिकरण (साइ), खेलो इंडिया आणि प्राप्तिकर विभागाचे कार्यालय आहे. आता या संपूर्ण परिसरात नवीन क्रीडानगरी उभी राहणार आहे. मात्र, सध्या ही योजना केवळ एक प्रस्ताव म्हणून सादर करण्यात आली आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर प्रकल्पाला लागणारा अवधी आणि अंदाजे खर्च निश्चित करण्यात येईल, अशी माहितीही मंत्रालयाच्या सूत्रांनी दिली.

जागेचा वापर योग्यरीत्या होत नाही. त्यामुळेच स्टेडियमचा कायापालट करण्याचा विचार आहे. या जागी उभ्या राहणाऱ्या क्रीडानगरीत सर्व खेळांच्या सुविधा उपलब्ध असतील. खेळाडूंच्या निवासासाठीही येथे व्यवस्था केली जाणार आहे. या खेरीज मनोरंजनासाठी एक भाग राखीव ठेवण्यात येईल, असेही सूत्रांकडून सांगण्यात आले. क्रीडानगरीच्या प्रकल्पासाठी नगरविकास मंत्रालयासह अनेक मंत्रालय आणि विभागांमध्ये समन्वय आवश्यक असल्याने इतक्या तातडीने योजनेला सुरुवात होणार नाही असेही मानले जात आहे.

क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांनी अलीकडेच दोहा येथील क्रीडानगरीला भेट दिली होती. ऑस्ट्रेलियातील क्रीडानगरीबाबतही त्यांनी माहिती घेतली होती. त्या धर्तीवर भारतातही क्रीडानगरी उभारण्याचा क्रीडा मंत्रालयाचा मानस आहे. सध्या भारतात अहमदाबाद येथे सरदार वल्लभभाई पटेल क्रीडा संकुलाची निर्मिती केली आहे. हे संकुल २५० एकर जागेत वसलेले असून, यासाठी ४६०० कोटी रुपये खर्च आला आहे. विशेष म्हणजे २०३६ ऑलिम्पिक आणि २०३० राष्ट्रकुल स्पर्धेसाठी याच शहराचे यजमान म्हणून नाव देण्यात आले आहे.

### अन्य कार्यक्रमांचे आयोजन

**मैदानाच्या देखभालीच्या खर्चाचे कारण पुढे करत खेळांखेरीज अन्य व्यावसायिक कारणांसाठी विशेषत: संगीत रजनीसाठी मैदानाचा उपयोग केला जाऊ लागला. यामुळे आयोजकांवर आणि व्यवस्थापनावर बरीच टीका करण्यात आली. मैदानाची मालकी क्रीडा प्राधिकरणाकडे असून, यावर मार्ग काढण्यासाठी त्यांनी अशा कार्यक्रमांसाठीच्या मूल्यात वाढ केली. तसेच अशा कार्यक्रमानंतर मैदान चांगल्या स्थितीत परत न केल्यास दंड आकारण्यास सुरुवात केली. तेव्हापासून मैदानाचा वापर मर्यादित राहिला. नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू स्टेडियम १९८२ मध्ये आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी तयार करण्यात आले. त्यानंतर २०१० मधील राष्ट्रकुल स्पर्धेपूर्वी ९६१ कोटी रुपये खर्च करून याचे नूतनीकरण करण्यात आले. अलीकडेच येथे जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आयसीसीने तांत्रिक कारणामुळे अयोग्य ठरविण्यापूर्वी येथे काही एकदिवसीय क्रिकेट सामन्यांचेही आयोजन करण्यात आले होते.**

## सिद्धार्थ मंडळ, श्री सिद्धिविनायक मंडळ कुमार गटात अंतिम विजेते

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

४३व्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत सिद्धार्थ मंडळ व श्री सिद्धिविनायक मंडळ यांनी अनुक्रमे पूर्व व पश्चिम विभागात कुमार गटात विजेतेपद पटकाविले.




पूर्व विभागातील कुमारांच्या अंतिम सामन्यात मुलुंडच्या सिद्धार्थ क्रीडा मंडळाने घाटकोपरच्या ओवाळी क्रीडा मंडळावर विजय मिळवीत जेतेपदावर आपले नाव कोरले. पूर्वार्धात पिछाडीवर पडलेल्या सिद्धार्थने सामना संपायला ५मिनिटे असताना बरोबरी साधली. नंतर अधिक आक्रमता दाखवीत ५गुणांनी विजेतेपद आपल्याकडे खेचून आणले. अमरजीत राजभर, संकेत यादव यांच्या चढाई पकडीच्या संयमी खेळाला या विजयाचे श्रेय जाते. ओवळीच्या मंगेश गुरव, यश मोरे यांचा जोश उत्तरार्धात कमी पडला.

पश्चिम विभागातील कुमारांच्या अंतिम सामन्यात दहिसरच्या श्री सिद्धिविनायक संघाने यजमान पार्ले महोत्सव स्पोर्टस् अकॅडमीचा पराभव करीत जेतेपदाला गवसणी घातली. ओम कुदळे, हर्ष गुरव, साहिल जाधव यांनी सुरवातीपासुन आक्रमक खेळावर जोर देत पहिल्या डावात सिद्धिविनायकने आघाडी घेतली. पण दुसऱ्या डावात सावध खेळ करणाऱ्या सिद्धिविनायक संघाला पार्ल्याच्या अभिषेक यादव, तनिष मांडवकर यांनी झुंजार खेळ करीत चांगलेच जेरीस आणले. वेळेचे गणित न जमल्याने त्यांना उपविजेते पदावर समाधान मानावे लागले.

## पाकिस्तानी क्रिकेटपटूच्या घरावर अंदाधुंद गोळीबार

**नवी दिल्ली :** पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज नसीम शाह एकीकडे टीमसोबत श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्याच्या तयारीत व्यस्त असताना त्याच्या पाकिस्तानमधील घरावर अज्ञातांनी गोळीबार केला. सोमवारी सकाळी खैबर पख्तूनख्वा इथल्या लोअर दीर जिल्ह्यातील मयार भागात अज्ञात हल्लेखोरांनी नसीमच्या घरावर गोळीबार केला. पाच अज्ञात बंदूकधाऱ्यांनी हा हल्ला केला आणि त्यानंतर ते तिथून पळून गेले. या गोळीबारात घराबाहेर पार्क केलेल्या एका कारचं नुकसान झालं आणि घराच्या खिडक्या फुटल्या. व्हिडीओमध्ये नसीमच्या घराच्या मुख्य दरवाजावर गोळ्यांचे निशाण दिसून आले.

## पुणे ग्रामीण किशोरी गटाचे विजेते



**| पुणे | वृत्तसंस्था |**

पुणे ग्रामीण, परभणीने यांनी ३६व्या राज्यअजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत किशोर व किशोरी गट विजेतेपद मिळविले. परभणीचे जेतेपदाचे सलग दुसरे वर्ष.

किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात पुणे ग्रामीण संघाने अहमदनगरचा ३९-२० असा लिलया पराभव करीत स्व. राजश्री चंदन पांडे चषकाबरोबरच आमदार चषकावर पहिल्यांदा आपले नाव कोरले. आक्रमक सुरुवात करणाऱ्या पुण्याने पहिला लोण देत पूर्वार्धात आघाडी घेतली. उत्तरार्धात आपल्या खेळातील जोश कायम राखत दुसरा लोण दिला. मानसी गावडे, धुविता माने यांच्या धारदार चढायाना सई जाधवची मिळालेली पकडीची साथ यामुळे हा विजय सोपा गेला. मुंबई शहर पश्चिम, नाशिक ग्रामीण या बलाढ्य संघाना पराभूत करणाऱ्या अहमदनगरला अंतिम सामन्यात मात्र ही किमया साधता आली नाही. त्यांच्या ज्ञानेश्वरी ढवण, फौजीया शेख, श्रेया अडसुळ यांचा खेळ या सामन्यात बहारला नाही.

किशोर गटाच्या अंतिम सामन्यात गतविजेत्या परभणीने पालघरला नमवीत स्व. प्रभाकर नागो पाटील चषकाबरोबर आमदार चषकावर आपले नाव कोरले. पहिल्या डावात दोन्ही संघानी एकमेकाचा अंदाज घेत खेळ केल्याने विश्रांतीला गुणफलक परभणीकडे झुकला होता. दुसऱ्या डावात मात्र जोरदार मुसंडी मारत परभणीने २ लोण देत सलग दुसऱ्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरले. राहुल चव्हाण, विजय तारे यांच्या चौफेर चढाया त्यांना दिपराज कांबळे, सुनिलकुमार कांबळे यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे हा विजय शक्य झाला. पालघरच्या विनीत पाचलकर, ध्रुव डोंगरे, निशांत बाईत यांचा पहिल्या डावातील जोश दुसऱ्या डावात दिसला नाही. या स्पर्धेचे बक्षीस वितरण विधान सभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे व राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबूराव चांदेरे यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी शकुंतला खटावकर, वासंती सातव-बोर्डे, राजू घुले, शोभा भगत, संगीता सोनावणे, नितीन घुले उपस्थित होते.

## कूच बिहार सामन्यासाठी रिलायन्स नागोठणे सज्ज

**| पोयनाड | प्रतिनिधी |**

कूच बिहार ट्रॉफी ही भारतीय क्रिकेट नियामक मंडळाद्वारे तर्फे आयोजित केली जाणारी १९ वर्षांखालील खेळाडूंसाठीची राष्ट्रीय चार दिवसीय क्रिकेट स्पर्धा आहे. या स्पर्धेतील महाराष्ट्र विरुद्ध ओडिसा हा साखळी फेरीतील सामना १६ ते १९ नोव्हेंबरपासून नागोठणे येथील



रिलायन्स क्रिकेट स्टेडियमच्या मैदान होणार आहे. या सामन्यासाठी रिलायन्स नागोठणे प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू असून क्रिकेट सामन्यासाठी सुसज्ज मैदान, सुरेख खेळपट्टी, खेळाडूंसाठी चांगल्या दर्जाचे पॅव्हेलियन व सुरक्षा व्यवस्था देण्यासाठी रिलायन्स नागोठणे प्रशासनाकडून पाहणी करून सामन्यासाठी लागणाऱ्या सर्व व्यवस्थेची पूर्तता करण्यात येत आहे. सर्व व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी शशांक गोयल, पुनीत मिश्रा, शरद पवार, शांताराम करंजे, इस्माईल पिट्टू, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश पाटील, सहसचिव जयंत नाईक, सदस्य ॲड.पंकज पंडित, शंकर दळवी, संदीप जोशी उपस्थित होते.

### जागतिक नेमबाजी स्पर्धा

## सम्राट राणाला सुवर्णपदक



**| कैरो | वृत्तसंस्था |**

कर्नालचा युवा नेमबाज सम्राट राणा याने जागतिक नेमबाजी स्पर्धेत भारतासाठी सुवर्णपदक जिंकले. सोमवारी, इजिप्तमधील कैरो येथे झालेल्या चॅम्पियनशिपच्या तिसऱ्या दिवशी, सम्राटने पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत २४३.७ गुणांसह पहिले स्थान पटकावले.चीनच्या हू काईने रौप्यपदक जिंकले, तर आणखी एक भारतीय, वरुण कुमारने कांस्यपदक जिंकले. महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत दुहेरी ऑलिंपिक पदक विजेत्या मनू भाकर आणि ईशा सिंग यांचे पदक थोडक्यात हुकले.

भारताने आज दोन सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य पदक जिंकले. यामुळे भारताच्या पदकांची संख्या १३ झाली आहे, ज्यात तीन सुवर्ण, तीन रौप्य आणि तीन कांस्य पदकांचा समावेश आहे. सध्या, पदक तालिकेत भारत दुसऱ्या स्थानावर आहे.

मनू अंतिम फेरीत चांगली कामगिरी करत होती पण १४ व्या शॉटमध्ये ८.८ गुणांच्या खराब गुणांमुळे ती अव्वल स्थानावरून सातव्या स्थानावर घसरली. १३९.५ गुणांसह ती पदकाच्या शर्यतीतून बाहेर पडली. तसेच, ईशा दबावाखाली दिसत होती. अंतिम फेरीत १०.७ गुणांच्या शानदार कामगिरीनंतर, ती १४ व्या शॉटमध्ये फक्त ८.४ गुण मिळवू शकली आणि सहाव्या स्थानावर राहिली. चीनच्या २० वर्षीय याओ कियानक्सुनने सुवर्ण, हाँगकाँग-चीनच्या हो चिंग शिंगने रौप्य आणि वेई कियानने कांस्यपदक जिंकले.

पिस्तूल सांघिक स्पर्धेत रौप्य पदक जिंकणे काहीसे सांत्वनदायक होते, जिथे ईशा, मनू आणि जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावर असलेल्या सुरुची इंदर सिंग (५७७) यांनी १७४० गुणांसह दुसरे स्थान पटकावले. पात्रता फेरीत दमदार कामगिरीच्या आधारे ईशा आणि मनू दोघांनीही अंतिम फेरीत प्रवेश केला. पात्रता फेरीत ईशाने ५८३ गुणांसह चौथे स्थान मिळवले. तिसऱ्या मालिकेतही तिने परिपूर्ण १०० गुण मिळवले.

## श्रेयस अय्यरच्या मागे शुक्लकाष्ठ

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

श्रेयस अय्यर हा भारतीय क्रिकेटमधील एक चांगला फलंदाज आहे. मधल्या फळीत टीम इंडियाला आवश्यक असलेल्या फलंदाजाचे सर्व गुण त्याच्यात आहेत. मात्र गेल्या काही वर्षात त्याला दुखापतीचं ग्रहण लागलं आहे.

ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या वनडे मालिकेत त्याला गंभीर दुखापत झाली. इतकंच काय तर त्याला आयसीयूत भरती करण्याची वेळ आली होती. आता घरी आला असून त्यातून सावरत आहे. पण आता होणाऱ्या दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेला मुकण्याची शक्यता आहे.

श्रेयस अय्यर आणि दुखापत यांची नकोशी युती २०२१ पासून सुरु झाली आहे. इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात पुण्यात त्याच्या खांद्याला दुखापत झाली होती. त्यामुळे आयपीएल २०२१ स्पर्धेला मुकला होता. बॉर्डर गावस्कर २०२३ स्पर्धेदरम्यान त्याच्या पाठीला दुखापत झाली आणि क्रिकेटच्या मैदानापासून दूर गेला. त्यानंतर एप्रिल महिन्यात त्याच्या पाठीवर शस्त्रक्रिया झाली. त्यानंतर आयपीएल स्पर्धा खेळू शकला नव्हता.

२०२४ वर्षात पुन्हा एकदा पाठदुखाने डोकं वर काढलं होतं. त्यामुळे इंग्लंड कसोटी मालिकेतून त्याने माघार घेतली होती.



### हंगामातील ७वा विजय | पॉइंट टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावर

## मँचेस्टर सिटीचा लिव्हरपूलवर विजय

**| नवी दिल्ली | प्रतिनिधी |**

रविवारी झालेल्या इंग्लिश प्रीमियर लीगमधील एका हाय-व्होल्टेज सामन्यात मँचेस्टर सिटीने लिव्हरपूलचा ३-० असा पराभव केला. सिटीने सुरुवातीपासूनच खेळावर नियंत्रण ठेवले आणि संपूर्ण सामन्यात लिव्हरपूलला एकही संधी दिली नाही.सिटीचा हा सलग दुसरा विजय होता, ज्यामुळे त्यांना पॉइंट टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावर नेण्यात आले. दरम्यान, गतविजेत्या लिव्हरपूलने या हंगामात आतापर्यंत पाच सामने गमावले आहेत आणि लीग स्टँडिंगमध्ये आठव्या स्थानावर आहे.



एतिहाद स्टेडियमवर झालेल्या पहिल्या हाफमध्ये एर्लिंग हालांडला पेनल्टी मिळाली, जी लिव्हरपूलचा गोलकीपर जियोर्गी मामारदश्विलीने वाचवली. तथापि, हालांडने २९ व्या मिनिटाला मॅथियस न्युन्सच्या शानदार क्रॉसवर हेडरने गोल करून सिटीला आघाडी मिळवून दिली.हाफ टाईमच्या काही मिनिटे आधी, निको गोंझालेझचा शॉट व्हर्जिल व्हॅन डिज्कला लागला आणि तो पोस्टच्या बाहेर गेला आणि सिटीने २-० अशी आघाडी घेतली.

दुसऱ्या हाफमध्ये लिव्हरपूलने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी झाला. ६३ व्या मिनिटाला जेरेमी डोकूने शानदार गोल करून संघाला ३-० अशी आघाडी मिळवून दिली. मँचेस्टर सिटीने मॅनेजर पेप ग्वार्डिओला यांच्या कारकिर्दीतील १००० वा सामना साजरा केला. हा ग्वार्डिओला यांचा १००० वा सामना होता आणि त्यांनी त्यांचा ७१६ वा विजय नोंदवला. त्यापैकी ३८८ सामने त्यांनी सिटीसोबत खेळले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)